- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

सोने-चांदी
- ✔ २४ कॅरेट : १,५२,७०० /-
- ✔ २३ कॅरेट : १,५२,३५० /-
- ✔ चांदी : २,३८,३००/-

विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, १४ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २४६ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# पंजाबच्या माजी उपमुख्यमंत्र्यांवर नांदेडच्या गुरुद्वारात हल्ला

## सुखबीरसिंह बादल यांची प्रकृती स्थिर, हातावर कृपाणने हल्ला करणारा जसपालसिंह कोण?

**वृत्तसंस्था, नांदेड**

पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि शिरोमणी अकाली दलाचे प्रमुख सुखबीरसिंह बादल यांच्यावर नांदेड येथील गुरुद्वारा परिसरात प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. तख्त सचखंड श्री हजूर साहिब येथे कुटुंबासह दर्शन घेऊन बाहेर पडत असताना एका हल्लेखोराने त्यांच्यावर कृपाणने वार केला. या हल्ल्यात बादल यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली असून त्यांना तातडीने नांदेड येथील यशोसाई रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. हल्ल्यानंतर तिथे उपस्थित सुरक्षा रक्षकांनी आणि पोलिसांनी आरोपीला तात्काळ घटनास्थळावरूनच ताब्यात घेतले. त्याचं नाव जसपालसिंह (वय ६२) असून तो मूळचा पुण्याचा राहणारा आहे. त्याने पुणे न्यायालयात वकील म्हणून काम केलेले आहे. जसपालसिंह हा गेल्या २ वर्षांपासून नांदेडजवळील एका गुरुद्वारात सेवाभावी काम करत होता.

सुखबीरसिंह बादल हे मातासाब गुरुद्वारातून बाहेर पडताच जसपालसिंगने कृपाण काढून त्यांच्यावर हल्ला चढवला. पोलीस सध्या त्याची कसून चौकशी करत आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली असून नांदेडचे पोलीस अधीक्षक यांच्याकडून घटनेची संपूर्ण माहिती घेतली आहे. मुख्यमंत्र्यांनी सुखबीरसिंह बादल यांच्याशी फोनवरून संवाद साधून त्यांच्या आरोग्याची विचारपूस केली. या हल्ल्यामागे नेमका काय उद्देश होता आणि कोणती पार्श्वभूमी आहे, याचा सखोल तपास करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी पोलिसांना दिले आहेत.

त्याचसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही सुखबीरसिंह बादल यांच्याशी फोनवरून चर्चा केली आणि त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली.



सुखबीरसिंह बादल यांच्यावर हल्ला होण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधी ४ डिसेंबर २०२४ रोजी अमृतसर येथील ऐतिहासिक सुवर्णमंदिराच्या प्रवेशद्वारावर त्यांच्यावर गोळीबार करण्याचा प्रयत्न झाला होता. त्या वेळीही ते बालबाल वाचले होते. नांदेड हे शिख धर्मातील पाच तक्तांपैकी एक महत्त्वाचे धार्मिक स्थळ असून जिथे १० वे गुरु गोविंद सिंग जी यांनी आपल्या आयुष्याचा अंतिम काळ घालवला होता. या घटनेनंतर सुखबीरसिंह बादल यांच्या सुरक्षेत मोठी वाढ करण्यात आली आहे.

## थोडक्यात

### उदय सामंत यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड

**मुंबई :** राजकीय वर्तुळातून एक मोठी बातमी समोर आली आहे. शिवसेना शिंदेगटाचे नेते आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाला. नागपूरवरून गडचिरोलीला जात असताना ही घटना घडली. उड्डाण करताच तांत्रिक बिघाड झाल्याचे पायलटच्या लक्षात आल्याने मोठा अनर्थ टळला. उदय सामंत हे गडचिरोलीत पाहणी दौरा करण्यासाठी निघाले होते. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, मंत्री उदय सामंत यांच्या हेलिकॉप्टर गुरूवारी सकाळी तांत्रिक बिघाड झाला. उदय सामंत नागपूरवरून गडचिरोली येथील सुरजागड येथे पहाणी दौरा करणार होते. हेलिकॉप्टर उड्डाणादरम्यान पायलटला तांत्रिक बिघाड झाल्याचे लक्षात आला होता. त्यामुळे पायलटने उड्डाण थांबवलं यामुळे मोठा अनर्थ टळला. हेलिकॉप्टर उड्डाणापूर्वी तांत्रिक तपासणीत बिघाड लक्षात का आला नाही? याची चौकशी करण्याची मागणी स्थानिक शिवसैनिकांनी केली. हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यानंतर उदय सामंत यांच्या गडचिरोली दौऱ्याला उशिर झाला. या घटनेनंतर माध्यमांशी संवाद साधताना उदय सामंत यांनी सांगितले की, सकाळी पावणे नऊ वाजता मी नागपूरवरून सूरजागडच्या प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी निघालो होतो.

## शालार्थ घोटाळ्यातील शिक्षणाधिकारी फरार, पथक मागावर

**वृत्तसंस्था, नाशिक**

शालार्थ आयडी घोटाळ्यातील संशयित आरोपी तथा नाशिक जिल्हा परिषदेचे तत्कालीन शिक्षणाधिकारी नितीन बच्छाव यांना शासनाने निलंबित केले आहे. शालार्थ आयडी घोटाळ्यात संशय तसेच गडचिरोली येथे जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी म्हणून बदली झाल्यानंतर कर्तव्यावर नियमित हजर न राहणे या कारणांमुळे त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.

शालार्थ आयडी घोटाळ्याच्या माध्यमातून शासनाची १६० कोटींची फसवणूक करण्यात आली आहे. नाशिक पोलिसांच्या विशेष तपास पथकाकडून या घोटाळ्याचा तपास सुरु असतानाच बच्छाव यांच्या निलंबनाचे आदेश निघाल्याने शैक्षणिक व प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने बच्छाव यांना निलंबित केले आहे.

सध्या ते फरार असून, नाशिक पोलिस आयुक्तालयाचे विशेष तपास पथक त्यांचा शोध घेत आहे. शालार्थ आयडी घोटाळ्यासंदर्भात बच्छाव यांच्याविरुद्ध नाशिकरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्यांचा सहभाग समोर आल्यानंतर ते फरार झाले असून विशेष तपास पथकाकडून त्यांचा शोध घेतला जात आहे. बच्छाव यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित असून, त्यांच्या कामकाजाची विभागीय चौकशी करण्याचे आदेशही शासनाने दिले आहेत. गडचिरोली जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या वस्तुस्थिती अहवालानंतर कारवाईची प्रक्रिया पुढे सरकली.

नाशिक ग्रामीण आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासातील बाबी तसेच कार्यालयात विनापरवानगी गैरहजर राहिल्याचा आरोप या सर्व बाबींचा विचार करून शासनाने बच्छाव यांना निलंबित करण्याचा निर्णय घेतला. १३ मार्च २०२६ रोजी गडचिरोली कार्यालयात हजर झाल्यानंतर बच्छाव यांनी कोणताही रजा अर्ज न देता पुन्हा गैरहजेरी लावल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

## कुंभमेळा श्रद्धेचा मेळा की भ्रष्टाचाराचा मेळावा?; काँग्रेसचा महाजनांवर हल्लाबोल

**वृत्तसंस्था, मुंबई**

कुंभमेळा श्रद्धेचा मेळा की भ्रष्टाचाराचा मेळावा? असा सवाल उपस्थित करत काँग्रेसने भाजप सरकारला धारेवर धरले आहे. शेकडो कोटींच्या वर्क ऑर्डर्स निघत असताना प्रशासन झोपले होते का? बनावट टेंडरच्या माध्यमातून एवढा मोठा गैरव्यवहार होत असताना जबाबदार अधिकारी कोण? असा सवाल काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. या सर्व प्रकारामुळे आता राजकीय वातावरण तापले असून, आगामी काळात या प्रकरणात आणखी कोणकोणते मोठे चेहरे समोर येतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

नाशिक येथे आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कामांसाठी ५९१ कोटी रुपयांच्या बनावट वर्क ऑर्डर तयार करून ठेकेदारांकडून ३ कोटींहून अधिक रक्कम उकळल्याचा



धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात राज्याचे कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांचा दूरचा नातेवाईक (पुतण्या) तनय महाजन याचा या घोटाळ्यात सहभाग आहे. काँग्रेसच्या नेत्या वर्षा गायकवाड यांनीही (ट्विटर) वर ट्विट करत सरकारला धारेवर धरले. त्यांनी विचारले की, कुंभमेळा हा श्रद्धेचा उत्सव आहे की सत्ताधा-यांच्या कमाईचा मेळा?

भाविकांच्या श्रद्धेच्या नावावर ५९१ कोटींच्या बनावट वर्क ऑर्डर्सचे वृत्त अत्यंत गंभीर आहे. सरकारी तिजोरी लुटण्याचा हा कोणता विकास? कागदावर कामे, बनावट कागदपत्रे आणि सरकारी यंत्रणेला अंधारात ठेवून काढलेल्या वर्क ऑर्डर्स हा केवळ भ्रष्टाचार नाही, तर तो भाविकांच्या श्रद्धेवर आणि जनतेच्या पैशांवर टाकलेला दरोडा आहे.

मंत्री महोदयांनी नातेवाईकापासून हात झटकले आहेत. पण या ऑर्डर्स निघेपर्यंत सरकार आणि प्रशासन काय करत होते? जर कुंपणच शेत खात असेल, तर कारवाई कशी होणार? या गैरव्यवहाराचा एक-एक रुपया कुणाच्या खिशात गेला आणि कोणाच्या आशीवार्दाने हे घडले, याचा हिशोब जनतेला मिळालाच पाहिजे. कुंभमेळा श्रद्धेचा आहे, सत्ताधा-यांच्या नातेवाईकांच्या तिजोरी भरण्यासाठी नाही, असा घणाघात गायकवाड यांनी केला.

नाशिकमध्ये पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ५९१ कोटींच्या ५ बनावट निविदा काढण्यात आल्या होत्या. यात हाउसकीपिंग, पोलिसांना आहार, स्नानासाठी साहित्य पुरवणे अशा कामांचा समावेश होता. याप्रकरणी मंत्री गिरीश महाजन यांच्या जामनेर (जळगाव) मतदारसंघातून तिघांना अटक करण्यात आली आहे. यात तनय अनंत महाजन, नरेंद्र तोताराम महाजन आणि शकील अहमद सलीमउद्दीन शेख यांचा समावेश आहे. ठेकेदारांचा विश्वास बसावा म्हणून त्यांनी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे खोटे दस्तऐवज, विभागीय आयुक्तांची बनावट डिजिटल सही आणि भारत सरकारची राजमुद्रा वापरून वर्क ऑर्डर्स दिल्या होत्या.

वडेट्टीवार यांनी केली उच्चस्तरीय चौकशीची मागणी

या ठगांनी एका ठेकेदाराला हाउसकीपिंगचे काम मंजूर करून देण्याचे खोटे आश्वासन देऊन त्याच्याकडून तब्बल २ कोटी १७ लाख ५० हजार रुपये उकळले. तर, छत्रपती संभाजीनगर येथील एका ठेकेदाराने २५ लाख रुपये दिले आहेत. या प्रकरणी नाशिकरोड पोलिस ठाण्यात ३ स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या आरोपींना कोणाचे राजकीय संरक्षण आहे, याची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. राम मंदिराच्या दानपेटीतील चोरीनंतर आता कुंभमेळ्याच्या नावाने भ्रष्टाचार सुरू असेल, तर महाराष्ट्र हे खपवून घेणार नाही अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

## भूसंपादनात सहखातेधारांचा हिस्साही होणार निश्चित

- महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय
- संयुक्त मोजणीवेळीच होणार पोटहिस्सा मोजणी
- मोबदल्यावरून होणारे वाद, प्रकल्प विलंब टळणार
- महसूल विभागाकडून कार्यपद्धती जारी

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

सार्वजनिक विकास प्रकल्पांसाठी जमीन संपादित करताना सहधारकांमध्ये नुकसान भरपाईच्या वाटपावरून होणारे वाद आणि न्यायालयीन प्रकरणांमुळे भूसंपादनाला होणारा विलंब कायमचा टळणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भात महत्त्वपूर्ण व धोरणात्मक निर्णय घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार हा निर्णय आज जारी करण्यात आला.

आता भूसंपादन प्रकरणांतील संयुक्त मोजणीच्या वेळीच सर्व सहधारकांचे जमिनीतील प्रत्यक्ष ताब्यानुसार व हिस्सानिहाय क्षेत्र निश्चित केले जाणार आहे. या निर्णयानुसार, संयुक्त मोजणी अहवालातच प्रत्येक सहधारकाचे क्षेत्र स्पष्टपणे नमूद करण्याबाबतची नवी मानक कार्यपद्धती महसूल विभागाने आज जारी केली आहे.

**पूर्वीची अडचण,**



**निर्णयाची गरज**

प्रचलित पद्धतीनुसार एखाद्या सर्वे नंबर किंवा गट नंबरमधील अंशतः जमीन संपादित करताना संपूर्ण गटाची एकत्रित मोजणी केली जात असे. मात्र, अंतर्गत पोटहिश्श्यांची स्वतंत्र मोजणी न झाल्याने नक्की कोणत्या सहधारकाच्या ताब्यातील किंवा हक्कातील जमीन संपादित होत आहे, हे स्पष्ट होत नसे. त्यामुळे विशेष भूसंपादन अधिकारी सर्व सहधारकांची नावे नमूद करून एकत्रित क्षेत्राचा अंतिम निवाडा जाहीर करत असत. परिणामी सर्वच सहधारक मोबदल्याची मागणी करत असल्याने प्रशासनाला निर्णय घेणे कठीण जात होते आणि प्रकरणे प्राधिकरणाकडे अथवा न्यायालयात वर्ग करावी लागत असत.

महसूलमंत्र्यांच्या या निर्णयामुळे मोजणीच्या टप्प्यावरच हिस्सानिहाय क्षेत्र निश्चित होणार असून, मोबदला वाटप थेट व पारदर्शक पद्धतीने होणार आहे.

**मानक कार्यपद्धतीतील महत्त्वाचे मुद्दे**

**सहधारकांना पूर्वसुचना व उपस्थिती :** मोजणीपूर्वी संबंधित सर्वे/गट नंबरमधील सर्व सहधारकांना नियमानुसार नोटीस बजावून प्रत्यक्ष जागेवर उपस्थित राहण्याची संधी दिली जाईल.

**वस्तुस्थितीनुसार प्रारूप नकाशा :** महसुली अभिलेख, नोंदणीकृत खरेदीखत, वाटपपत्र, वारसा नोंदी व जागेवरील वस्तुस्थिती विचारात घेऊन स्वतंत्र सीमा व क्षेत्रासह हिस्सानिहाय प्रारूप नकाशा तयार केला जाईल.

> एकाच गटातील खातेदारांमधील आपापसातील तंटे संपुष्टात येतील. न्यायालयीन प्रकरणांची संख्या घटेल आणि प्रत्यक्ष बाधित होणाऱ्या शेतकऱ्याला त्याच्या हक्काचा मोबदला विनाअडथळा त्वरित मिळेल. महामार्ग, रेल्वे, जलसिंचन व इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण होण्यास मोठी मदत होणार असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.
> - चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री

**गाव चावडीवर १५ दिवस प्रसिद्धी :** तयार केलेला प्रारूप नकाशा व विवरणपत्रक संबंधित गावच्या चावडीवर किमान १५ दिवसांसाठी प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागवल्या जातील.

**एक महिन्यात हरकतींचा निकाल :** प्राप्त हरकतींवर उप अधीक्षक भूमि अभिलेख सुनावणी घेतील आणि संयुक्त मोजणी झाल्यापासून १ महिन्याच्या आत कायदेशीर आदेश पारित करतील.

**अभिलेख दुरुस्ती (फॉर्म ११ व १२) :** सुनावणीनंतर किंवा हरकती न आल्यास हिस्सा फॉर्म क्र. ११ (आकारफोड) व फॉर्म क्र. १२ (फाळणीबारा) तयार करून महसुली अभिलेखात दुरुस्ती केली जाईल.

**अधिसूचनेनंतरचे व्यवहार अमान्य :** भूसंपादनाची प्रारंभिक अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर झालेले जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार किंवा हस्तांतरणे पोटहिस्सा मोजणीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

**न्यायालयीन वादासाठी स्वतंत्र मार्ग :** मालकी हक्काबाबत न्यायालयात वाद प्रलंबित असल्यास संबंधितांना सक्षम न्यायालयातच दाद मागावी लागेल.

**अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित :** या प्रक्रियेत विशेष भूसंपादन अधिकारी, उप अधीक्षक भूमि अभिलेख आणि भूसंपादन संस्था यांच्या कामाची व समन्वयाची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

## सर्वसामान्यांना वीजदरवाढीचा शॉक, महावितरणाच्या निर्णयाने ग्राहक चिंतेत

**वृत्तसंस्था, मुंबई**

उन्हाळ्यामध्ये सर्वसामान्य ग्राहकांना वीजदरवाढीचा मोठा आर्थिक फटका सहन करावा लागला. पावसाळा सुरू झाल्यानंतर वीजबील कमी येइल या आशेवर वीजग्राहक बसले होते. मात्र महावितरणाने एक मोठा निर्णय घेतला असून पुन्हा एकदा सामान्यांच्या खिशाला कात्री बसणार आहे. वीज वापरणाऱ्या ग्राहकांच्या ऑगस्ट महिन्याच्या बिलाचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. जुलै महिन्यात झालेल्या वीज वापरासाठी महावितरणने इंधन समायोजन शुल्क लागू केले आहे. त्यामुळे घरगुती ग्राहकांसह व्यावसायिक, औद्योगिक आणि इलेक्ट्रिक वाहन वापरणाऱ्यांना प्रत्येक युनिटमागे अतिरिक्त रक्कम भरावी लागणार आहे. वापराच्या स्लॅबनुसार या शुल्काची रक्कम वेगवेगळी असेल.

यंदाच्या उन्हाळ्यात राज्यातील विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली होती. वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी महावितरणला काही प्रमाणात महागड्या दराने वीज खरेदी करावी लागली. या अतिरिक्त वीजखरेदीचा खर्च भरून काढण्यासाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निदेर्शानुसार इंधन समायोजन शुल्क आकारण्यात येत असल्याचं महावितरणकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. घरगुती वीज वापराच्या श्रेणीनुसार ग्राहकांवर वेगवेगळ्या प्रमाणात शुल्क आकारलं जाणार आहे.

दारिद्र्य रेषेखालील ग्राहकः
१० पैसे प्रति युनिट
१०० युनिटपर्यंत वापरः
२० पैसे प्रति युनिट
१०१ ते ३०० युनिटः
४० पैसे प्रति युनिट
३०१ ते ५०० युनिटः
५० पैसे प्रति युनिट
५०० युनिटपेक्षा अधिक वापरः
६० पैसे प्रति युनिट

**व्यापारी आणि उद्योगांनाही फटका**

इंधन समायोजन शुल्काचा परिणाम केवळ घरगुती ग्राहकांपुरता मर्यादित राहणार नाही. कमी दाबाच्या व्यावसायिक ग्राहकांसाठी वापराच्या श्रेणीनुसार ४० ते ६० पैसे प्रति युनिट अतिरिक्त शुल्क आकारलं जाणार आहे. औद्योगिक ग्राहकांनाही या शुल्काचा सामना करावा लागणार आहे. कमी दाबाच्या उद्योगांसाठी प्रति युनिट २५ ते ३५ पैसे, तर उच्चदाबाच्या उद्योगांसाठी श्रेणीनुसार ३० ते ४५ पैसे अतिरिक्त आकारले जातील.

**इलेक्ट्रिक वाहन चार्जिंगही महागणार**

इलेक्ट्रिक वाहनधारकांनाही या निर्णयाचा परिणाम जाणवणार आहे. ई-व्हीकल चार्जिंग स्टेशनसाठी प्रति युनिट ३० पैसे इंधन समायोजन शुल्क लागू करण्यात आलं आहे. त्यामुळे इलेक्ट्रिक वाहन चार्ज करण्याचा खर्चही वाढण्याची शक्यता आहे.

शेतीच्या वीज वापरावरही शुल्क
शेतीसाठी वापरल्या जाणा-या विजेवर प्रति युनिट १५ ते २५ पैसे इंधन समायोजन शुल्क लागू करण्यात आलं आहे.

संपादकीय लेखणीतून...

## हातमागः निसर्गाशी नाळ जोडणारे जुने क्षेत्र

भारतात 'राष्ट्रीय हातमाग दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा स्पष्ट उद्देश हातमागाच्या उत्पादनांना आणि ते बनवणाऱ्या कारागिरांना प्रोत्साहन देणे हा आहे. हातमाग क्षेत्र हे आपल्या देशाच्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे आणि आपल्या देशातील ग्रामीण आणि अर्ध-ग्रामीण भागातील उदरनिर्वाहाचा महत्त्वपूर्ण स्त्रोत आहे. हे एक असे क्षेत्र आहे जे प्रत्यक्ष महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्य करते कारण यात ७० टक्क्यांहून अधिक विणकर आणि संबंधित कामगार महिला आहेत. निसर्गाशी नाळ जोडलेल्या या क्षेत्रात भांडवल आणि उर्जेची आवश्यकता अतिशय कमी असल्यामुळे ही पर्यावरणास अनुकूल अशी उत्पादन प्रक्रिया आहे. जलद गतीने बदलणारे फॅशन ट्रेंड आणि ग्राहकांच्या आवडीची गरज पूर्ण करण्यासाठी या क्षेत्रात नवीन मागणीप्रमाणे बदल करण्याची क्षमता आहे.

दि.७ ऑगस्ट १९०५ रोजी सुरू करण्यात आलेल्या स्वदेशी चळवळीने स्वदेशी उद्योगांना आणि विशेषतः हातमाग विणकरांना प्रोत्साहन दिले होते. त्यावर्षी भारत सरकारने दरवर्षी ७ ऑगस्ट हा राष्ट्रीय हातमाग दिन म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला. पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी साहेबांनी दि.७ ऑगस्ट २०१५रोजी चेन्नई येथे पहिल्या राष्ट्रीय हातमाग दिनाचे उद्घाटन केले होते. या दिवशी आपण आपल्या हातमाग विणकाम समुदायाचा सन्मान करतो आणि आपल्या देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात या क्षेत्राचे योगदान अधोरेखित करतो. आपल्या हातमागाच्या वारशाचे संरक्षण करण्यासाठी आणि हातमाग विणकर आणि कामगारांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि त्यांच्या उत्कृष्ट कारागिरीचा अभिमान निर्माण करण्यासाठी आम्ही आमच्या संकल्पाचा पुनरुच्चार करतो. हातमाग म्हणजे हातांनी, हातपाय दोन्ही वापरून चालविता येणारा माग आहे. माग हे वस्त्र विणण्यासाठी वापरण्यात येणारे एक उपकरण- यंत्र आहे. सुताचे उभे धागे ताणात ठेवून आडव्या धाग्यांनी विणणे हे याचे काम आहे. मागाच्या आकारात, आकारमानात व यांत्रिकीत भौगोलिक क्षेत्रानुसार काही बदल असू शकतात, परंतु, त्याचे पायाभूत काम वर दिल्याप्रमाणेच असते. महाराष्ट्रातील इचलकरंजी हे शहर हातमाग या उद्योगासाठी प्रसिद्ध आहे. हातमाग उद्योग हा हातमागाच्या साहाय्याने विणकाम करून कापड बनविण्याचा उद्योग होय. विणकामाच्या या पद्धतीत ताणा (उभे) व बाणा (आडवे) अशी संरचना वापरून कापड तयार करतात. ताण्याच्या समांतर लांब धाग्यांत त्यांना काटकोनात असलेले बाण्याचे धागे गुंतविले जातात. हे धागे गुंतविण्याचे काम ज्या चौकटीत घडवितात, तिला माग असे म्हणतात. मागांचे मुख्यतः स्वयंचलित-यंत्रमाग) व मनुष्यबळ संचलित असे दोन प्रकार आहेत. मनुष्यबळ संचलित मागात ओढमाग व हातमाग यांचा समावेश होतो. राष्ट्रीय हातमाग दिन साजरा करण्यामागे स्वातंत्र्यापूर्वीची ही घटना ठरली कारणीभूत- दरवर्षी ७ ऑगस्ट हा दिवस भारतात राष्ट्रीय हातमाग दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा स्पष्ट उद्देश हातमागाच्या उत्पादनांना आणि ते बनवणाऱ्या कारागिरांना प्रोत्साहन देणे हा आहे, पण या दिवसाच्या उत्सवाची सुरुवात कशी झाली आणि त्याचे महत्त्व काय आहे, याबद्दल जाणून घेऊया.

देशातील हातमाग उद्योगाला सक्षम बनवण्याच्या आणि हातमागांना जगभरात मान्यता मिळावी या उद्देशाने साजरा केला जातो. हातमाग हा आपल्या भारताच्या सांस्कृतिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग आहे. कपड्यांपासून घराच्या सजावटीपर्यंत हातमागाचा आता विशेष समावेश केला जात आहे. त्यामुळे या उद्योगात रोजगार वाढला असून कारागिरांची स्थितीही सुधारत आहे. मोठ्या संख्येने लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याबरोबरच हातमागामुळे महिलांना स्वावलंबी बनण्याची संधी मिळते. आपल्या देशात अशी अनेक राज्ये आहेत, जी विशेषतः हातमागांसाठी ओळखली जातात. यामध्ये आंध्र प्रदेशची कलमकारी, गुजरातची बांधणी, तामिळनाडूची कांजीवरम आणि महाराष्ट्राची पैठणी, मध्यप्रदेशची चंदेरी, बिहारची भागलपुरी रेशीम असे काही हातमाग आहेत, ज्यांची जगभरात ख्याती आहे.

सन १९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने बंगालच्या फाळणीची घोषणा केली. त्याच दिवशी कोलकात्याच्या टाऊन हॉलमध्ये मोठ्या जाहीर सभेने स्वदेशी चळवळीची सुरुवात झाली. या घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी ७ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय हातमाग दिन साजरा केला जातो. ७ ऑगस्ट २०१५ रोजी पंतप्रधानांनी या दिवसाची सुरुवात केली होती. तेव्हापासून हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो. यंदा २०२४मध्ये १०वा हातमाग दिन साजरा केला जाईल. हातमाग दिन का साजरा केला जातो? तर हातमाग दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे, हा आहे. याशिवाय, विणकर समाजाचा सन्मान करण्याच्या उद्देशाने आणि भारताच्या सामाजिक-आर्थिक विकासातील त्यांच्या योगदानाचे कौतुक करण्याच्या उद्देशाने हातमाग दिन साजरा केला जातो. हातमागापासून बनवलेल्या वस्तू देशाच्या कानाकोपऱ्यात आणि परदेशात पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे भारताला वेगळी ओळख मिळेल, तसेच विणकर समाजालाही पुढे जाण्याची संधी मिळेल.

# मुलाने आईला संपवून जीवनयात्रा संपवली, वडील देशाच्या सेवेत तैनात

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

शहरातील तरोडा खुर्द परिसरातील राहुल कॉलनीमध्ये शनिवारी ८ ऑगस्ट २०२६ सायंकाळी एक अत्यंत धक्कादायक, सुन्न करणारी आणि कौटुंबिक नात्यांना काळीमा फासणारी दुर्दैवी घटना घडली. केंद्रीय राखीव पोलीस दलात सेवा बजावत असलेल्या एका जवानाच्या २५ ते २६ वर्षीय मुलाने राहत्या घरात स्वतःच्या आईची लोखंडी रॉड आणि बॅटने मारहाण करून निर्घृण हत्या केली. यानंतर आरोपी मुलाने स्वतःही गळफास लावून आत्महत्या केली. रविवारी (९ ऑगस्ट) सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे. भारती बालाजी चौथरे (वय ५०) असे मृत दुर्दैवी आईचे नाव असून, प्रतीक बालाजी चौथरे (वय २६) असे हत्या करून आत्महत्या केलेल्या मुलाचे नाव आहे.

मृत प्रतीकचे वडील बालाजी चौथरे हे केंद्रीय राखीव पोलीस दलात कार्यरत असून ते सध्या कर्तव्यावर बाहेरगावी तैनात आहेत. तर त्यांची मुलगी उच्च शिक्षणासाठी पुण्यात वास्तव्यास आहे. नांदेड येथील तरोडा खुर्द भागातील राहुल कॉलनीत असलेल्या घरात आई भारती आणि मुलगा प्रतीक हे दोघेच राहत होते. गेल्या काही महिन्यांपासून प्रतीक हा तीव्र मानसिक तणाव आणि डिप्रेशनमध्ये होता. त्याने घराबाहेर पडणे जवळपास पूर्णपणे बंद केले होते. तो सतत घरातच राहून ऑनलाईन शॉपिंग अॅप्सवरून दैनंदिन वस्तू आणि विविध साहित्य ऑर्डर करत असे. शनिवारी (८ ऑगस्ट) सायंकाळी ७ ते ९ च्या सुमारास मानसिक संतुलन बिघडलेल्या प्रतीकचा आईसोबत काही कारणावरून वाद झाला असावा किंवा कौटुंबिक तणावातून त्याने अचानक भयानक पाऊल उचलले. त्याने घरातील लोखंडी रॉड आणि बॅटने आई भारती यांच्या डोक्यावर व शरीरावर गंभीर वार करून त्यांची निर्घृण हत्या केली. आईचा जागीच मृत्यू झाल्यानंतर प्रतीकने त्याच घरात गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली.

रविवार, ९ ऑगस्ट रोजी सकाळी बराच वेळ उलटून गेल्यानंतरही चौथरे यांच्या घरातून कोणतीही हालचाल दिसून आली नाही. तसेच नेहमीप्रमाणे सकाळी होणारा वावर थांबल्याने आणि घराचा मुख्य दरवाजा आतून बंद असल्याने शेजाऱ्यांना संशय आला. शेजाऱ्यांनी दरवाजा ठोठावला, मात्र आतून काहीच प्रतिसाद मिळाला नाही.

अखेर संशय बळावल्याने शेजाऱ्यांनी खिडकीची काच फोडून आत डोकावून पाहिले. त्यावेळी घरात भारती चौथरे रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या दिसल्या, तर मुलगा प्रतीक गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. हे दृश्य पाहून शेजाऱ्यांचे पाय पायाखालील जमीन सरकली. त्यांनी तातडीने नांदेड पोलिसांना या घटनेची माहिती दिली.

घटनेची बातमी मिळताच नांदेडच्या स्थानिक पोलीस ठाण्याचे पथक आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. ठसेतज्ज्ञ आणि फॉरेन्सिक टीमलाही पाचारण करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह विच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवले. प्राथमिक तपासात प्रतीकच्या तीव्र मानसिक तणावातून आणि डिप्रेशनमधून हा प्रकार घडल्याचे समोर येत आहे. मात्र, घटनेमागचे नेमके कारण काय होते, हत्येपूर्वी काही वाद झाला होता का, या सर्व बाबींचा पोलीस सखोल तपास करत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण नांदेड शहरात तीव्र शोक आणि हळहळ व्यक्त केली जात आहे.

वरील प्रकरणात, आईच्या हत्येनंतर आरोपीने स्वतःलाही संपवणे ही मानसिक आरोग्याच्या अत्यंत टोकाच्या आणि विस्कळीत स्थितीचे लक्षण आहे. रागाच्या किंवा मानसिक आवेगाच्या भरात हिंसक कृत्य घडल्यानंतर व्यक्तीला वास्तवाचे भान येताच पश्चात्ताप, प्रचंड भीती आणि गुन्हेगारीची भावना व्यापून टाकते.

या तीव्र मानसिक धक्क्याला आणि भविष्यातील परिणामांना सामोरे जाण्याची ताकद नसल्यामुळे, बदनामी व शिक्षेच्या भीतीपोटी व्यक्ती आत्महत्येचा मार्ग निवडते. अनेकदा तीव्र डिप्रेशन किंवा मानसोपचारविषयक आजारात विचार करण्याची क्षमता नष्ट झाल्यामुळे हत्येपाठोपाठ स्वतःचे आयुष्य संपवण्याचा दुर्दैवी प्रकार घडतो. आजच्या बदलत्या सामाजिक व सांस्कृतिक ताण्याबाण्यांमध्ये तरुण पिढीतील वाढती हिंसक वृत्ती, असंवेदनशीलता आणि कौटुंबिक नात्यांमधील दुरावा हा केवळ व्यक्तिगत किंवा कौटुंबिक स्वरूपाचा प्रश्न न राहता एक अत्यंत गंभीर व सखोल अभ्यासाचा विषय बनला आहे. जन्मदात्यांवरच होणारे हिंसक हल्ले आणि नात्यांचा होणारा संकोच यांमागे कौटुंबिक, तांत्रिक आणि मानसिक अशा अनेक घटकांचा गुंतागुंतीचा परस्परसंबंध दिसून येतो. आधुनिक जीवनातील वाढता वेग आणि तंत्रज्ञानाचा अतिवापर यांमुळे कुटुंबांमधील प्रत्यक्ष संवादाची जागा मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आभासी विश्वाने घेतली आहे. या आभासी जगात दाखवले जाणारे तात्पुरते सुख, अमर्याद स्वातंत्र्य आणि कल्पनाविलसित जीवन यांचा वास्तवाशी टकरांव होतो, तेव्हा तरुणांमध्ये अत्यंत कमी सहनशीलता आणि तीव्र नैराश्य निर्माण होते. यातूनच वैचारिक तफावत आणि 'जनरेशन गॅप' वाढून पालकांची बंधने किंवा अपेक्षा त्यांना आपल्या स्वातंत्र्यातील 'अडथळा' वाटू लागतात, ज्याचा परिपाक कौटुंबिक कलहात होतो.

दुसऱ्या बाजूला, या समस्येचा सर्वात महत्त्वपूर्ण पैलू म्हणजे तरुण वर्गामध्ये वेगाने वाढणारे मानसिक आजार आणि त्याकडे होणारे सामाजिक दुर्लक्ष होय. तीव्र डिप्रेशन, सायकोसिस किंवा व्यक्तिमत्त्व विकार यांसारख्या समस्या केवळ 'असमंजसपणा' नसून ते वैद्यकीय उपचार लागणारे आजार आहेत; परंतु समाजात मानसिक आरोग्याविषयी असलेल्या अज्ञानामुळे या लक्षणांकडे वेळेवर लक्ष दिले जात नाही. जेव्हा मानसिक आजार, आभासी जगातील एकाकीपणा आणि कौटुंबिक संवादाचा अभाव एकत्र येतात, तेव्हा व्यक्तीमध्ये प्रचंड राग आणि आक्रमकता निर्माण होऊन अशा दुर्दैवी व हिंसक घटना घडतात.

असे असले तरी, संपूर्ण तरुण पिढीला असंवेदनशील ठरवणे योग्य होणार नाही. यावर उपाय म्हणून कौटुंबिक पातळीवर मोकळा संवाद आणि प्रत्यक्ष सहवास वाढवणे, लहानपणापासूनच अपयश व नकाराला सामोरे जाण्याची सवय लावणे आणि मानसोपचार तज्ज्ञांच्या मदतीने वेळेत उपचार घेणे अत्यंत आवश्यक आहे. तरुणाईला योग्य दिशा देणे, त्यांच्यातील मानसिक तणाव वेळेत ओळखणे आणि नात्यांचे महत्त्व टिकवून ठेवणे हे आज कुटुंब आणि समाज दोघांचेही सामूहिक उत्तरदायित्व बनले आहे.

– ९५६१५९४३०६

# याला पोषण आहार म्हणायचा काय?

लीलाधर दवंडे
कामठी (नागपूर)

राज्यातील कुपोषणाचा प्रश्न संपुष्टात आणण्यासाठी येणारी नवी पिढी निरोगी आणि धडधाकट राहण्यासाठी, त्यांच्या शरीराला कार्बोदके, प्रथिने, स्निग्ध पदार्थ, जीवनसत्त्वे, खनिजे योग्य प्रमाणात मिळणे गरजेचे आहे. हे ओळखून आपल्याकडे १९९५-९६ मध्ये शालेय पोषण आहार योजना सुरू करण्यात आली. या माध्यमातून प्राथमिक विद्यार्थ्यांना ४५० उष्मांक व १२ ग्रॅम प्रथिने आणि उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक व २० ग्रॅम प्रथिनेयुक्त ताजे शिजवलेले अन्न दिले जाते. हा आहार वाढावा म्हणून प्रयत्नही सुरू आहेत. या संतुलित आहारामुळे शरीराची योग्य वाढ होऊन रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि ऊर्जा मिळते.

शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था आणि अनुदानित शाळांमधील पहिली ते आठवीचे विद्यार्थी या योजनेचे लाभार्थी असतात. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना वरण-भात, खिचडी, चौरस पौष्टिक आहार आणि काही वेळा अंडी किंवा केळी दिली जातात. यासाठी शाळांत स्वयंपाकी किंवा मदतनीस यांची देखील नियुक्ती करण्यात आली आहे. शासन या योजनेवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करते. यातून सरकारी शाळांतील पटसंख्या वाढावी हा सुद्धा सरकारचा अंतर्गत हेतू असावा, यात मुळीच शंका नाही.

याच अनुषंगाने अंगणवाडी पोषण आहार योजनेमध्ये लहान मुले, गर्भवती महिला व स्तनदा माता यांना कुपोषण दूर करण्यासाठी आणि शारीरिक विकासासाठी पौष्टिक अन्न दिले जाते. यामध्ये प्रामुख्याने तांदूळ, गहू, डाळी, कडधान्य, तसेच काही केंद्रांवर दूध, अंडी आणि पौष्टिक खिचडी दिली जाते. मात्र, कोट्यवधी रुपये खर्च करून राबविण्यात येणाऱ्या पोषण आहार योजनेतील अन्नच पौष्टिक नसेल, तर या योजनेलाच हरताळ फासल्यासारखे वाटू लागले आहे. गेल्या काही वर्षांपासून ही योजना राबवितांना यातून पुरविण्यात येणारे अन्न घटक किती नित्कृष्ट दर्जाचे आणि भेसळयुक्त आहेत, याची शाश्वती खाली दिलेल्या विविध उदाहरणावरून हमखास यायला लागते.

देशातील भावी पिढी असे नित्कृष्ट दर्जाचे अन्न घटक खाल्ल्यानंतर खरेच सुदृढ होईल की पुन्हा कुपोषित होईल, बिमार पडेल याचा विचार महिला व बालकल्याण खात्याच्या अधिकाऱ्यांनी करणे फार गरजेचे आहे. एकीकडे जनतेला विषमुक्त अन्न मिळावे म्हणून अन्न आणि औषध प्रशासनाने कंबर कसली असतांना शालेय पोषण आहारातील घोळ वाढत जात असेल तर सरकारचे कोट्यवधी रुपये पाण्यात गेल्यासारखेच म्हणावे. विशेष म्हणजे हा आहार पुरविण्याचे काम विविध कंत्राटदारांकडून होत असल्याने बऱ्याच शंकांना वाव उरते.

गरोदर मातांना अंगणवाडी केंद्रातून देण्यात आलेल्या पोषण आहाराच्या पॉकेटमध्ये चक्क दगड व कचरा आढळून आल्याचे प्रकरण नुकत्याच गेल्या जुलैच्या शेवटच्या आठवड्यात पांढरकवडा तालुक्यातील बोरगाव कडू येथे उघडकीस आले. या विरोधात स्थानिक मनसे सैनिकांनी शड्डू ठोकला असून सदर प्रकरण राज्यात बरेच गाजले आहे. असा कचरायुक्त पोषण आहार म्हणजे गरोदर मातांच्या पोटातील शिशुवर अत्याचारच नाही काय? यामुळे त्याची वाढ होईल की त्याचा श्वासच बंद होईल, याचा तरी विचार पुरवठादारांनी करायला हवा. निव्वळ भेसळखोरी आणि नफाखोरी यामुळे त्यांचे खिसे भरल्या जात असले तरी, हे नित्कृष्ट अन्न लोकांच्या जीवावर उठते, त्याचे काय?

निव्वळ दगड आणि कचराच नाही तर मृत विषारी प्राणी सुद्धा या पोषण आहारांतून निघाल्याच्या घटना पुढे आल्या आहेत. तरी सुद्धा प्रशासन यावर मूग गिळून गप्प बसले असेल तर, डाळीत काळं असावं, या म्हणण्याला वाव ठरतो. ऑगस्ट २०२४ च्या धाराशिव तालुक्यातील पाडोळी गावात पूनम सौदागर जाधव यांना दिलेल्या पोषण आहारात चक्क तळलेला बेडूक निघाला होता. आता सीलबंद पॅकेटमध्ये जर बेडूक निघत असेल तर पोषण आहार पॅकेटबंद करणारे कामगार किती निष्काळजीपणे कामं करतात, याचं दुसरं उदाहरण देण्याची गरज नाही. या घटनेचा पंचनामा त्यानंतर एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या अधिकाऱ्यांकडून केला गेला, हे वेगळे.

अशीच दुसरी घटना त्याच महिन्यात अकोला जिल्ह्यात तळेगाव डवला येथील शालेय पोषण आहाराबाबत घडली होती. यात तर मसाला पॅकेटमध्ये चक्क मृत पाल आढळून आली होती. जर ती पाल चुकून स्वयंपाकात गेली असती तर? पण, तरीही त्या पुरवठादाराला काळ्या यादीत टाकले असेल, यावर शंकाच उपस्थित होते. सरकारच्या चांगल्या योजनांची अशी ऐसी तैसी करत लेकरांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा गुन्हेगारांना सक्त शिक्षा व्हायला हवी. दुर्दैवाने तसे काही होतांना दिसत नाही आणि म्हणूनच भेसळखोरांनी देशात आपले साम्राज्य उभे करण्यात यश मिळविले आहे. एकटे तुकाराम मुंढे लढून चालणार नाही. तर, अन्न आणि औषध प्रशासनातील, महिला व बाल कल्याण विभागातील अधिकाऱ्यांनी सुद्धा यावर कडक उपाययोजना करणे गरजेचे आहे.

या घटनांच्या पूर्वी २०२४ च्या जून महिन्यात नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या घाटरोहणा येथील अंगणवाडीत लाभार्थी नील नेहल शिंदेकर याला देण्यात आलेल्या पोषण आहाराच्या पॉकेटमध्ये मेलेल्या पक्ष्यांचे अवयव सापडले होते. किती किळसवाणा प्रकार म्हणायचा हा! असे मृत पशू-पक्षी निघायला लागल्यावर कुणाच्या पोटात त्याचा घास जाईल? गरिबांची लेकरं म्हणून काहीही खायला देणे, हे कितपत योग्य वाटते?

मागे, मेळघाटातील एका शाळेत सुद्धा शालेय पोषण आहारात देण्यात आलेल्या चॉकलेटमध्ये अळ्या आढळून आल्या होत्या. यावरून ते चॉकलेट एकतर नित्कृष्ट दर्जाचे असावेत किंवा त्यांची कालमर्यादा संपलेली असावी. २०२२ च्या मार्चमध्ये गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा चंगेरा येथे शालेय पोषण आहार कंत्राटदार श्री हरी राईस अँड अॅग्रो लिमिटेडने केलेल्या धान्य पुरवठ्यात मोठ्या प्रमाणात कचरा, धूळ, सिमेंट आणि गुटख्याचे पाऊच आढळून आले होते. याविषयीची तक्रार देखील उपसरपंच नजमा खान यांनी त्यावेळी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांकडे केली होती. त्यानंतर काय झाले, त्यांनाच ठाऊक. मात्र, अशा कचऱ्यायुक्त धान्याला पोषण आहार म्हणता येईल काय?

हे तर काहीच नाही. मागे सांगली जिल्ह्यातील पलूस येथे माजी सैनिक सुभाष निवृत्ती जाधव यांना त्यांचा नातू शिरीष याच्यासाठी मिळालेल्या पोषण आहाराच्या पॉकेटमध्ये तर वाळा जातीच्या सापाचे मृत पिल्लूच निघाले होते. या प्रकरणाचे पडसाद नंतर त्यावेळी विधिमंडळात सुद्धा उमटले होते. असेच चिखलदरा शहरातील एका अंगणवाडी केंद्रात पॅकेटबंद खिचडीत अळ्या निघाल्याची तक्रार समाज माध्यमांवर आली होती. हल्ली पोषण आहारात झुरळ, किडे, धूळ इतकेच काय तर ब्लेडचे तुकडे निघणे सुद्धा सामान्य झाल्यासारखे वाटते आहे. पण, यामुळे कुणाचे आरोग्य बिघडल्यास त्याला जबाबदार कोण असेल?

बालकांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सुरू केलेल्या पोषण आहारास जर भ्रष्टाचाराची किड लागली असेल तर त्यावर कठोर कारवाईची फवारणी करणे सुद्धा तितकेच गरजेचे आहे. बालकांना आणि गरोदर तसेच स्तनदा मातांना देण्यात येणाऱ्या अशा कीडयुक्त तसेच नित्कृष्ट दर्जाच्या आहारांना खरेच पोषण आहार म्हणायचे की, विषारी अन्न? या प्रश्नाचे उत्तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी शोधायला हवे.

– ८४१२८७७२२०

# कुटुंबातील आनंदाचा सुगंध-बहर

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

राष्ट्रीय पुत्र- मुलगा आणि मुलगी दिवस हा दरवर्षी ११ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो, ज्याचा उद्देश पालक आणि त्यांच्या मुलांमधील संबंध साजरे करणे आणि त्यांना ओळखणे आहे. या दिवसाचा मुख्य हेतू पालकांना त्यांच्या मुलांसाठी असलेले प्रेम, अभिमान आणि कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी देणे आहे. मुलांनी आपल्या जीवनात आणलेली आनंद, वाढ आणि शिकवणूक यावर विचार करण्याचा हा एक उत्तम प्रसंग आहे. कुटुंबे हा दिवस विविध प्रकारे साजरा करतात. काहीजण आपल्या मुलांसोबत वेळ घालवतात, त्यांना आवडणाऱ्या क्रियाकलापांमध्ये सहभागी होतात आणि अविस्मरणीय आठवणी निर्माण करतात. यावेळी पालक आपल्या मुलांसोबत मनमोकळ्या संवादात गुंततात, एकत्र जेवण करतात किंवा साध्या प्रेमळ कृतींनी आपले प्रेम व्यक्त करतात. राष्ट्रीय मुलगा आणि मुलगी दिवस हा कौटुंबिक संबंधांचे महत्त्व अधोरेखित करतो आणि मुलगा आणि मुलगी यांची अनोखी भूमिका ओळखतो. मुलांचे योगदान, व्यक्तिमत्व आणि यशांचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांना महत्व देण्यासाठी हा दिवस एक चांगली संधी आहे. कुटुंबातील प्रेम आणि समर्थनाच्या बंधांना मजबूत आणि आनंदी बनवण्यासाठी हा दिवस एक उत्तम स्मरण आहे. मुलांना नेहमीच आधार देणे आणि त्यांच्या यशस्वी जीवनासाठी प्रोत्साहन देणे हे प्रत्येक पालकाचे कर्तव्य आहे, आणि हा दिवस त्या गोष्टीचे स्मरण करून देतो.

आई वडिलांचं आपल्या मुला-बाळांवर जितकं प्रेम असतं. ज्याची सर दुसऱ्या कोणत्याही नात्याला येऊ शकत नाही, खास करुन वडिलांचे आपल्या मुलीवर अधिक प्रेम असते, तर आईची मुलावर अधिक माया असते, यात मुलगी घरची शान असते तर मुलगा आई-वडिलांचा अभिमान असतो. यात आपल्या देशात मुलगा-मुलगी समान असे धोरणं आहे. त्यामुळे मुलींचा ज्याप्रमाणे सन्मान होते त्याप्रमाणे मुलांचाही व्हावा अशी इच्छा असते. अखेर आज मुलांचा सन्मान करण्याचा दिवस आला आहे. दरवर्षी ४ मार्च हा राष्ट्रीय पुत्र दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमित्त आपल्या कुटुंबातील प्रत्येक मुलाचा सन्मान केला जावा असा उद्देश असतो. राष्ट्रीय पुत्र दिवस का साजरा केला जातो? तर सन २०१८मध्ये पहिल्यांदाच राष्ट्रीय पुत्र दिवस साजरा करण्यात आला. या दिवसाची स्थापना जिल निको यांनी केली. आजच्या जगात पालकांना मुलींप्रमाणे मुलांच्या संगोपनाचे महत्व समजावे हा या मागचा मुख्य उद्देश आहे. मुलगा आपल्या आई- वडिलांना, कुटुंबाला कोणत्याही परिस्थिती सांभळण्यासाठी प्रयत्न करतो, वेळेप्रसंगी कुटुंबाचे रक्षण करतो. घरातील मुलगी लग्न करून जेव्हा सासरी जाते त्यानंतर आई झ वडिलांना मुलाचा एक मोठा आधार असतो. वृद्ध वयात मुलगा आपला सांभाळ करेल अशी प्रत्येक आई- वडिलांची अपेक्षा असते. याप्रमाणे अनेक मुलं आई-वडिलांना सांभाळतात. घरावर कठीण प्रसंग आला तर न खचता कुटुंबातील मुलगा सर्व परिस्थिती सावरून घेण्यासाठी झटतो. अशा प्रत्येक मुलाचा सन्मान या दिनानिमित्त झाला पाहिजे अशी अपेक्षा असते.

अगदी बालपणापासूनचं प्रत्येक आई-वडिलांनी मुलींप्रमाणे मुलांचे चांगले संगोपन केले पाहिजे. मुलींबाबत समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी अनेक समारंभ, कार्यक्रम घेतले जातात, त्याप्रमाणे मुलांसाठीही असे अनेक कार्यक्रम घेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मुलगी असो वा मुलगा दोन्ही कुटुंबासाठी तितकेच आपलेसे असतात, हे सांगण्याची गरज निर्माण झाली आहे. म्हणून भारतात दरवर्षी राष्ट्रीय पुत्र दिवस साजरा केला जातो. यादिनानिमित्त तुम्ही तुमच्या भावाला, मित्रांना काही खास भेट, शुभेच्छा देऊन हा दिवस साजरा करू शकता. मुलगा (पुत्र) आणि मुलगी (पुत्री) हे मानवी समाजाचे दोन महत्त्वाचे घटक आहेत. निसर्गाने दोघांना समान अधिकार आणि महत्त्व दिले आहे. वैज्ञानिकदृष्ट्या, मूल मुलगा किंवा मुलगी होणे हे पुरुषाच्या गुणसूत्रांवर (क्रोमोझोम्सवर) अवलंबून असते, आणि यामध्ये स्त्रीला जबाबदार धरले जाणे हा एक सामाजिक गैरसमज आहे.

– ९६९९८३६७१७

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# 'ई-प्रमाण'मुळे नोंदणी दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रती आता घरबसल्या

## मुद्रांक व नोंदणी विभागातील तीन महत्त्वपूर्ण उपक्रमांचा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते शुभारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

नोंदणीकृत दस्तऐवज, सूची क्रमांक २ आणि विवाह प्रमाणपत्रांच्या डिजिटल स्वाक्षरीयुक्त प्रमाणित प्रती नागरिकांना घरबसल्या ऑनलाइन उपलब्ध करून देणाऱ्या ई-प्रमाण प्रकल्पाचा राज्यव्यापी शुभारंभ महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आला. यासोबतच नोंदणी अभिलेखांचे डिजिटायझेशन आणि नोंदणी व मुद्रांक विभागातील अधिसूचित सेवांचे सुलभीकरण या दोन महत्त्वपूर्ण उपक्रमांचेही उद्घाटन करण्यात आले.

यावेळी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे, जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल, सहकार आयुक्त दीपक तावरे, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक मंजिरी मनोलकर, सहनोंदणी महानिरीक्षक राजेंद्र मुठे उपस्थित होते.

**ई-प्रमाणमुळे प्रमाणित प्रती घरबसल्या**

ई-प्रमाण प्रकल्पामुळे नागरिकांना नोंदणीकृत दस्तऐवज, सूची क्रमांक २ तसेच विवाह प्रमाणपत्रांच्या डिजिटल स्वाक्षरीयुक्त प्रमाणित प्रती ऑनलाइन मिळणार आहेत. या प्रमाणित प्रती रटर लिंक किंवा व्हॉट्सअपच्या माध्यमातून घरबसल्या प्राप्त करता येणार आहेत. डिजिटल स्वाक्षरी आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आल्याने या प्रती विश्वासार्ह, सुरक्षित आणि छेडछाडमुक्त राहणार आहेत. या उपक्रमामुळे कागदविरहित प्रशासनाला चालना मिळण्याबरोबरच अभिलेख सुरक्षितता, प्रशासकीय कार्यक्षमता आणि महसूलवाढीस मदत होणार आहे.

**१८६५ पासूनच्या अभिलेखांचे डिजिटायझेशन**

नोंदणी व मुद्रांक विभागातील सन १८६५ ते २००१ या कालावधीतील उपलब्ध जुने नोंदणी अभिलेख, तसेच शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे येथील उपलब्ध अभिलेखांचे डिजिटायझेशन करण्यात येत आहे. यामुळे जुने व महत्त्वपूर्ण अभिलेख डिजिटल स्वरूपात सुरक्षित आणि दीर्घकालीन जतन करणे शक्य होणार आहे. तसेच नागरिकांना जुन्या अभिलेखांच्या प्रमाणित प्रती अधिक जलद व सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

**अधिसूचित सेवांचे सुलभीकरण**

नागरिकांना सुलभ, पारदर्शक, कालबद्ध, नागरिकाभिमुख आणि डिजिटल सेवा उपलब्ध करून देण्यासाठी गव्हर्नन्स प्रोसेस री-इंजिनिअरिंग अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या अधिसूचित सेवांचे पुनर्विलोकन करण्यात आले आहे. यानुसार समान स्वरूपाच्या सेवांचे एकत्रीकरण, अनावश्यक सेवांचे विलोपन, सेवा प्रक्रियेचे सुलभीकरण, आवश्यक कागदपत्रे आणि डेटा एन्ट्रीची क्षेत्रे कमी करणे, सेवा मंजुरीतील टप्पे कमी करणे, तांत्रिक प्रणालींचे एकत्रीकरण तसेच ऑनलाइन सेवा वितरण याबाबत सेवांचे सुलभीकरण करण्यात आले आहे.

**नोंदणी, मुद्रांक आणि जमाबंदी विभागाच्या कामकाजाचा आढावा**

यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक कार्यालय तसेच जमाबंदी विभागाच्या विविध कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा, अभिलेखांचे डिजिटायझेशन, डिजिटल पद्धतीने प्रमाणित प्रती उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया, विभागातील तांत्रिक प्रणालींचे एकत्रीकरण आणि सेवांचे सुलभीकरण याबाबत त्यांनी माहिती घेतली. नोंदणी अभिलेखांचे सुरक्षित जतन आणि त्यांचा नागरिकांना सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी सुरू असलेल्या डिजिटायझेशनच्या कामाचीही त्यांनी माहिती घेतली. तसेच नागरिकांना कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची आवश्यकता कमी करून अधिकाधिक सेवा ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विभागाने केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. जमाबंदी विभागाच्या कामकाजाचाही यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला. महसूल अभिलेखांचे डिजिटल स्वरूपात जतन, नागरिकांना महसूलविषयक सेवा सुलभरीत्या उपलब्ध करून देणे आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासकीय प्रक्रिया अधिक गतिमान करण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या कामांची माहिती घेण्यात आली. नागरिकांना महसूल, नोंदणी आणि मुद्रांक विभागाच्या सेवा अधिक वेगवान, पारदर्शक आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

# मौदा येथे भाजपकडून तिरंगा रॅली आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

१३ ऑगस्ट रोजी नगरपंचायत मौदा यांच्या वतीने भव्य तिरंगा रॅलीचे व वृक्षारोपण एक पेड मा के नाम या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या रॅलीची सुरुवात मौदा नगराध्यक्ष राजाभाऊ तिडके यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

या तिरंगा रॅलीमध्ये मौदा शहरातील तिडके कॉलेज, जनता ज्युनियर कॉलेज, शिर्डी साई कॉन्व्हेन्ट तसेच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांकडून विविध देशभक्तीपर वेशभूषा करण्यात आल्या असून भारत माता वेशभूषेने रॅलीचे विशेष आकर्षण वाढविले. या रॅलीमध्ये भारतीय जनता पार्टी मौदा शहर व मौदा तालुका यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच सर्व शासकीय अधिकारी-कर्मचारी आणि विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रध्वजाचा सन्मान, राष्ट्रप्रेम, एकता व देशभक्तीची भावना जागृत करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही तिरंगा रॅली उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात पार पडली. यावेळी प्रामुख्याने उपस्थित डॉ.राजीवजी पोतदार आमदार विधान परिषद, टेकचंदजी सावरकर माजी आमदार कामठी, मौदा विधानसभा आनंदरावजी राऊत जिल्हाध्यक्ष भारतीय जनता पार्टी, नागपूर जिल्हा अनिल निधान महामंत्री भाजपा नागपूर जिल्हा, प्रीतीताई मानमोडे अध्यक्ष महिला आघाडी नागपूर जिल्हा, भाजपा निशाताई सावरकर माजी जिल्हा परिषद अध्यक्ष, चेतन खडसे भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष नागपूर जिल्हा, राहुल किरपाण महामंत्री नागपूर जिल्हा, भगवानजी बानकुळे तालुकाध्यक्ष भाजपा, मुकेश अग्रवाल माजी तालुकाध्यक्ष, राधाताई अग्रवाल माजी जिल्हा परिषद सदस्य, डॉ. नीलिमाताई घाटोळे, रमेश भाऊ कुंभलकर नगरसेवक तथा अध्यक्ष भारतीय जनता पार्टी मोरेश्वर ते नगरसेवक नगरपंचायत मौदा राजकुमार सोमनाथे नगरसेवक नगरपंचायत मौदा, उमेशजी गभने नगरसेवक नगरपंचायत मौदा, पद्मावती ताई चलसानी नगरसेवक मौदा, दीपिकाताई पोटभरे, नगरसेवक नगरपंचायत मौदा राहुल पोटभरे नगरसेवक नगरपंचायत मौदा, कल्पनाताई मानकर अध्यक्ष भाजपा महिला आघाडी, प्रकाश कुहीकर, कार्याध्यक्ष भाजपा मौदा बंटी हटवार, अध्यक्ष भारतीय जनता युवा मोर्चा, शिवराज माथुरकर महामंत्री भाजपा नागपूर जिल्हा, मुन्ना चलसानी माजी उपाध्यक्ष न.प.मौदा, देवराव करडभाजणे, मोरेश्वर राजगिरे, अशोक वंजारी, राजकुमार जयस्वाल, नानाजी इंगळे, विजय हटवार, माजी नगरसेविका सुषमाताई कुंभलकर, सुनीताताई पाराशर, पृथ्वीराज गुजर, दुर्गाताई वैद्य, सावित्रीताई काटकर, आशाताई काटकर, दिलीप सिरसाम, शरद भोयर, अंकित वाडीभस्मे तसेच कार्यकर्ते व युवा पदाधिकारी उपस्थित होते.

# दवलामेटीत किराणा दुकान फोडून ३८ हजारांचा मुद्देमाल लंपास
## लोखंडी शटरचे कुलूप तोडून चोरट्याचा प्रवेश, वाडी पोलिसांत तक्रार

**दै. सिंहवाणी वृत्त, दवलामेटी :** दवलामेटी परिसरातील एसएन मार्ट या किराणा दुकानाचे लोखंडी शटरचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने रोख रकमेसह सुमारे ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना गुरुवारी सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी



दुकानमालक अक्षय अशोक कातखेडे (३०) यांनी वाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कातखेडे यांनी १२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता दुकान उघडले होते. रात्री १० वाजता दुकान बंद करून ते घरी गेले. दरम्यान, रात्री १० ते १३ ऑगस्ट रोजी सकाळी ५.३० वाजताच्या सुमारास अज्ञात चोरट्याने दुकानाच्या समोरील लोखंडी शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने कॅश ड्रॉवरमधील सुमारे ३० हजार रुपये तसेच अंदाजे ८ हजार रुपयांची इतर रोख रक्कम व चिल्लर असा एकूण सुमारे ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

सकाळी दुकानात चोरी झाल्याचे लक्षात येताच कातखेडे यांनी तत्काळ ११२ क्रमांकावर पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर वाडी पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून तक्रार नोंदवली. भरवस्तीत किराणा दुकान फोडून चोरी झाल्याने परिसरातील दुकानदारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. अज्ञात चोरट्याचा तातडीने शोध घेऊन चोरीचा मुद्देमाल हस्तगत करावा, अशी मागणी नागरिक व दुकानदारांकडून होत आहे. प्रकरणाचा पुढील तपास वाडी पोलिस करीत आहेत.

# डब्लूसीएल आयटीआय अप्रेंटिस प्रशिक्षणार्थींचा संविधान चौकात आंदोलन संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

***भारतीय अप्रेंटिस संघाचे अध्यक्ष सुशीलकुमार निर्मलकर तसेच एसीसीएल प्रशिक्षणार्थी दिनेश राऊत व गोपाल हंबर्डे यांच्या नेतृत्वात हजारो प्रशिक्षणार्थींनी मागण्या डब्लूसीएल प्रशासनाकडे निवेदनाद्वारे सादर***




आज दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी संविधान चौक नागपूर येथे भारतीय अप्रेंटिस संघाच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष सुशीलकुमार निर्मलकर यांच्या नेतृत्वात डब्लूसीएल मधील सर्व विभागात ट्रेड अप्रेंटिस प्रशिक्षण पूर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थींच्या रोजगाराच्या मागणीसंदर्भात आंदोलन यशस्वीरीत्या पार पडले.

या आंदोलनात डब्लूसीएल प्रशासनाविरोधात जोरदार नारेबाजी व प्रशिक्षणार्थींवर झालेल्या अन्यायाविरुद्ध एल्गार पुकारण्यात आले. तसेच, डब्लूसीएल प्रशासन तथा प्रबंधनाकडून गेल्या ४ ते ५ वर्षांपासून अप्रेंटिसच्या नावावर प्रशिक्षणार्थींवर चुकीचे धोरण लादून त्यांचे अधिकार व हक्क पायदळी तुडवून त्यांच्याकडून सतत १२ महीने प्रत्यक्ष कोणतेही अधिकृत ट्रेड प्रशिक्षण न देता मजदूराप्रमाणेच कसून काम काढून घेण्यात आले. प्रशिक्षणार्थींकडून अनधिकृत काम करून घेत त्यांचा गैरवापर करण्यात आला. त्याच पार्श्वभूमीवर सदर सर्व प्रशिक्षित अप्रेंटिस युवक-युवतींना स्थानिक ठिकाणी त्यांच्या योग्यतेनुसार व शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध करून घ्यावा अशी ठाम मागणी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आली. कोल इंडीयाचीच दुसरी व समकंपनी एसीसीएल (छत्तीसगड) मध्ये याच झालेल्या चुकीच्या धोरणांप्रमाणे स्थानिक प्रशिक्षणार्थींनी आंदोलन केल्यानंतर मिळालेल्या यशानंतर व झालेल्या करारानुसार आऊटसौर्सिंगच्या माध्यमातून देण्यात येत असलेल्या नोकरीच्या पत्राचा संदर्भ घेऊन त्याच पार्श्वभूमीवर सर्व प्रशिक्षणार्थींना ततातडीने रोजगार उपलब्ध करावा यासाठी डब्लूसीएल महाप्रबंधक व संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करीत प्रामुख्याने मागणी करण्यात आली.

या आंदोलनानंतर प्रशिक्षणार्थींच्या रोजगाराच्या गंभीर प्रश्न व मागण्यांसंदर्भात डब्लूसीएल हेडक्वार्टर सिव्हिल लाईन्स येथे महाप्रबंधक कार्यालयात संबंधित अधिकारी महोदयांना तसेच, नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी महोदयांना निवेदन सादर करण्यात आले.

जिल्हाधिकारी महोदयांमार्फत देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्याचे मुख्यमंत्री, संबंधित राज्य तथा केंद्रीय मंत्री, स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी महोदयांना निवेदन पाठवून पत्रव्यवहार करण्यात आला. सदर आंदोलनात डब्लूसीएलच्या सर्व विभागाचे भारतीय अप्रेंटिस संघाचे पदाधिकारी तथा नेते प्रशिक्षणार्थी गणेश ताजने, विपुल काशिवार, सौरभ निनावेकर, प्रमोद तुरकर, श्रेयस माकडे, रूशान अली, अमन कावळे, वैष्णवी देठे, पायल कामडी, निखिल सोनटक्के, रोशन सोनटक्के, कुणाल वऱ्हाटे, सूर्यकांत वांढरे, निशांत पेंदाम, कुणाल कोरांगे, अक्षय बोढने, अंकुश कोवे व अन्य प्रशिक्षणार्थी हजारोंच्या संख्येने सहभागी होते.

# पारशिवनी भूमि अभिलेख कार्यालयात एसीबीचा छापा, २५ हजारांची लाच घेताना सर्व्हेअर रंगेहाथ अटकेत

## काम करून देण्यासाठी लाचेची मागणी, सापळा रचून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी येथील उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) गुरुवारी सायंकाळी सुमारे ६.१५ वाजताच्या सुमारास कारवाई करत सर्व्हेअर (भूमापक) विशाल माडगीकर याला २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे पारशिवनी तालुक्यातील प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली.

प्राप्त माहितीनुसार, तक्रारदाराचे संबंधित शासकीय काम करून देण्यासाठी आरोपी सर्व्हेअरकडून लाचेची मागणी करण्यात आली होती. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर एसीबीच्या पथकाने प्राथमिक पडताळणी केली. तक्रारीतील तथ्याची खात्री झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी गुरुवारी सायंकाळी सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून २५ हजार रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारताच एसीबीच्या पथकाने विशाल माडगीकर याला रंगेहाथ ताब्यात घेतले. त्यानंतर पथकाने कार्यालयीन परिसरात आवश्यक ती कारवाई पूर्ण केली. आरोपीला पुढील चौकशीसाठी संबंधित पोलीस ठाण्यात नेण्यात आले असून, प्रकरणाच्या अनुषंगाने तपास सुरू आहे.

या कारवाईदरम्यान एसीबीच्या अधिकाऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे व पुरावे ताब्यात घेतल्याची माहिती आहे. प्रकरणात पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असून, चौकशीनंतर आणखी काही बाबी समोर येण्याची शक्यता आहे. शासकीय कार्यालयात सायंकाळच्या सुमारास झालेल्या या कारवाईमुळे कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्येही चर्चेला उधाण आले. नागरिकांची शासकीय कामे पारदर्शकपणे व नियमानुसार व्हावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

बातमी लिहेपर्यंत आरोपीची चौकशी व प्रकरणातील पुढील कायदेशीर कारवाई सुरू होती.

**थोडक्यात**

# घराचे स्लॅब कोसळले, प्रमोद गजपुरे यांना आर्थिक मदतीची गरज



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

तालुक्यातील पेंढराबोडी येथील रहिवासी प्रमोद श्रावण गजपुरे (वय ३०) यांच्या घराचे स्लॅब गुरुवारी (१३ ऑगस्ट) पहाटे ३ वाजताच्या सुमारास अचानक कोसळले. सुदैवाने या घटनेत प्रमोद यांना कोणतीही शारीरिक इजा झाली नाही. मात्र, घराचे नुकसान झाल्याने त्यांच्यावर मोठे संकट ओढवले आहे. प्रमोद गजपुरे हे आपल्या ८५ वर्षीय आईसोबत राहतात. अत्यंत हलाखीची आर्थिक परिस्थिती असून कुटुंबाला उत्पन्नाचे कोणतेही ठोस साधन किंवा आधार नाही. अंदाजे १८ वर्षांपूर्वी शासनाच्या घरकुल योजनेतून त्यांनी घराचे बांधकाम केले होते. त्याच घराचे स्लॅब पडल्याने अशा परिस्थितीत घराची तातडीने दुरुस्ती करण्याचा खर्च करणे त्यांच्यासाठी मोठे आव्हान ठरत आहे. स्लॅब कोसळल्याने घराची झालेली दुरवस्था पाहता शासनाने या घटनेची दखल घेऊन संबंधित यंत्रणेमार्फत नुकसानीची पाहणी करावी आणि गजपुरे कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. शासनाच्या मदतीनेच घराची दुरुस्ती शक्य असल्याने प्रशासनाने या प्रकरणाकडे संवेदनशीलतेने पाहून तातडीने मदत करावी, अशी अपेक्षा प्रमोद गजपुरे यांनी व्यक्त केली आहे.

# १५ ऑगस्टनिमित्त बोरी व वाघबोडी येथील अंगणवाडीतील चिमुकल्यांना ड्रेस वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

मौदा तालुक्यातील गट ग्रामपंचायत बोरी-घिवारीच्या वतीने १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त या ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या बोरी( घिवारी) व वाघबोडी येथील अंगणवाडीतील मुला-मुलींना ड्रेसचे वाटप करण्यात आले. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर चिमुकल्या विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण व्हावी तसेच त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, या उद्देशाने ग्रामपंचायतीच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. ड्रेस मिळाल्यानंतर अंगणवाडीतील चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद विशेष आकर्षण ठरला.

गावातील बालकांचे शिक्षण, आरोग्य, संस्कार आणि सर्वांगीण विकास यांना ग्रामपंचायतीचे सदैव प्राधान्य राहील. भविष्यातही विद्यार्थ्यांसाठी आणि गावातील नागरिकांसाठी अशाच प्रकारचे लोकहिताचे उपक्रम राबविण्याचा ग्रामपंचायतीचा संकल्प असल्याचे सरपंच विशाल सेलोकर यांनी सांगितले. याप्रसंगी सरपंच विशाल सेलोकर, उपसरपंच दिनेश पटले, ग्रामपंचायत अधिकारी वैभव बावनकर, सर्व ग्रामपंचायत सदस्यगण, अंगणवाडी सेविका, मदतनीस उपस्थित राहून सर्वांनी सहकार्य केले.

# ग्राम विकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मेटपांजरा येथे 'व्यसनमुक्त विद्यार्थी, व्यसनमुक्त महाराष्ट्र'




**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नुकताच ग्रामविकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मेटपांजरा येथे पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांकरिता 'नशा मुक्ती' अभियानाचा कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुशील कुमार सोनवाने पोलीस उपनिरीक्षक पोलीस स्टेशन काटोल हे प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून प्राचार्या डॉ वैशाली जयंत टालाटुले उपस्थित होत्या. या नशामुक्ती अभियानाअंतर्गत सोनवणे साहेब यांनी विद्यार्थ्यांना तंबाखू,ड्रक्स, गुटखा, दारू, गांजा या अंमली पदार्थांचे दुष्परिणाम समजावून सांगितले. या चुकीच्या व्यसनापासून स्वतः दूर राहून समाजातील आपल्या जवळच्या मंडळीना सुद्धा दूर ठेवा अशा पद्धतीचे मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. वैशाली टालाटुले यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईल हाताळताना त्यावरील चुकीच्या प्रसार माध्यमाचा वापर टाळावा व्हाट्सअँप, इन्स्टाग्राम, फेसबुक यामध्ये आजची तरुण पिढी पूर्णपणे गुरफटून गेलेली आहे आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत आहे म्हणून विद्यार्थ्यांनी स्वतः ला यापासून दूर ठेवावे अशाप्रकारचे मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाला काटोल पोलीस स्टेशन काटोल येथील वरठे, पवार, दिंडे त्याचबरोबर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन केचे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

दैनिक सिंहवाणी वृत्त

Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : शनिवार, १४ ऑगस्ट २०२६

# चिटणीस पार्कमध्ये घुमला 'वंदे मातरम्'चा जयघोष

## सुमारे ५ हजार विद्यार्थ्यांनी एकसुरात केले सामूहिक गायन





दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

वंदे मातरम्च्या १५० वर्षपूर्तीच्या तसेच नागपूर महानगरपालिकेच्या ७५व्या वर्षाच्या गौरवपूर्ण निमित्ताने आज चिटणीस पार्क येथे देशभक्ती आणि राष्ट्रीय एकतेचे अद्भुत वातावरण पाहायला मिळाले. नागपूर महानगरपालिकेच्या सुमारे ५ हजार विद्यार्थ्यांनी एकसुरात राष्ट्रगीत वंदे मातरमचे सामूहिक गायन करून संपूर्ण परिसर देशभक्तीच्या स्वरांनी दुमदुमून टाकला.

या भव्य कार्यक्रमाला नागपूर महानगरपालिकेच्या महापौर नीता ठाकरे तसेच महानगरपालिका आयुक्त श्री विपिन हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी महापौर नीता ठाकरे आणि आयुक्त डॉ. विपिन यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना वंदेमातरम् च्या ऐतिहासिक महत्त्व, राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश दिला.

कार्यक्रमाची संकल्पना, समन्वय आणि पूर्वतयारीमध्ये नागपूर महानगरपालिकेच्या शिक्षण सभापती संतोष देवी दीपक लढ्ढा यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली. कार्यक्रमाच्या एक दिवस आधी त्यांनी संबंधित अधिकारी आणि शिक्षण विभागाच्या टीमसोबत बैठक घेऊन कार्यक्रमाची रूपरेषा, विद्यार्थ्यांचा सहभाग तसेच आवश्यक व्यवस्थांबाबत मार्गदर्शन केले होते.

मार्गदर्शन करताना महापौरांनी विद्यार्थ्यांचा देशाचे भविष्य असा उल्लेख करीत अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या देशभक्तीने देशासाठी भविष्यात उत्तोमोत्तम कार्य करण्याचा संदेश त्यांनी दिला. त्या पुढे म्हणाल्या की, स्वराज्य मिळवणे हे जितके महत्वाचे आहे, तितकेच महत्त्वाचे स्वराज्यातील सुराज्य टिकवणे आणि निरंतर प्रगतिशील ठेवणे आहे, या आयोजनाच्या माध्यमातून हीच भावना प्रत्येक विद्यार्थी आणि नागरिकांच्या मनात निर्माण होईल अशी अपेक्षा आहे. स्वातंत्र्य दिवस हा देशातील कुठल्याही सणांपेक्षा मोठा सण आहे, यात सर्वात चांगले कार्य म्हणजे प्रत्येक देशवासीयांच्या मनात राष्ट्रप्रेमाची-राष्ट्रभक्तीची भावना निर्माण करणे त्याच अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाच्या अंतर्गत देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात महानगरपालिकेच्या माध्यमातून असे विविध देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. 'वंदे मातरम' या गीताच्या प्रेरणेने भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी झालेल्या चळवळींना क्रांतिकारांना आणि स्वातंत्र्य सैनिकांना प्रवृत्त केले. आज ते केवळ एक गीत नसून देशाच्या गौरवशाली इतिहासाची आठवण करून देणारे गीत आहे. यावेळी महापौरांनी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे आणि शिस्तबद्ध व्यव्हाराचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षण सभापती संतोष देवी दीपक लढ्ढा यांनी केले. त्या म्हणाल्या वंदे मातरम् हे आपल्यासाठी केवळ राष्ट्रगीत नाही, तर भारतमातेप्रती असलेली श्रद्धा, स्वाभिमान आणि राष्ट्रभक्तीचे प्रतीक आहे. आज हजारो विद्यार्थ्यांनी एकसुरात वंदे मातरम्चे गायन करताना पाहणे हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा आणि भावनिक क्षण आहे. महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच संस्कार, देशप्रेम आणि जबाबदार नागरिक होण्याची प्रेरणा मिळावी, हा आमचा प्रयत्न आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, वंदे मातरम्च्या १५० वर्षपूर्तीचा आणि नागपूर महानगरपालिकेच्या ७५व्या वषार्चा हा ऐतिहासिक संगम आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा विषय आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना देशाच्या इतिहासाशी जोडण्याबरोबरच राष्ट्राप्रती आदर आणि जबाबदारीची भावना अधिक दृढ होते.

थोडक्यात

## उन्नत भारत अभियानांतर्गत २६ विद्यार्थ्यांनी ग्रामीण व आदिवासी भागांचा केला अभ्यास



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेच्या, नागपूर येथील २६ विद्यार्थ्यांनी उन्नत भारत अभियानांतर्गत मध्य प्रदेशातील झाबुआ तसेच महाराष्ट्रातील गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांतील ग्रामीण व आदिवासी भागात ७ ते १० दिवसीय सामाजिक इंटर्नशिप यशस्वीपणे पूर्ण केली. या इंटर्नशिपदरम्यान विद्यार्थ्यांनी शिवगंगा फाउंडेशन, जनजाति विकास समिती, निरामय बहुउद्देशीय सेवा संस्था आणि रोल फाउंडेशन यांच्या सहकार्याने ग्रामीण व आदिवासी समुदायांसोबत प्रत्यक्ष काम केले. ग्रामीण कुटुंबांसोबत राहून त्यांनी शिक्षण, आरोग्य, शेती, उपजीविका, कौशल्य विकास आणि पर्यावरणाशी संबंधित परिस्थितीचा सखोल अभ्यास केला.

उन्नत भारत अभियान, पूर्व विदभार्चे समन्वयक डॉ. भूषण राजपाठक यांच्या मार्गदर्शनात आयोजित या सामाजिक या इंटर्नशिपमध्ये व्हीएनआयटी, गव्हर्नमेंट इंजिनिअरिंग कॉलेज, आकर कॉलेज, दत्ता मेघे फिजिओथेरपी कॉलेज, कृषी महाविद्यालय, वरोरा, कमला नेहरू कॉलेज तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मॅनेजमेंट कॉलेज, नागपूर येथील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## दहेगाव रंगारी येथे एसबीआयचे एटीएम गॅस कटरने फोडण्याचा प्रयत्न

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

नागपूर-छिंदवाडा महामार्गावरील दहेगाव रंगारी येथील बस स्टॉप समोर सुंदर मॉलच्या बाजूला स्टेट बँक ऑफ इंडियाचे अज्ञात



चोरट्यानी गॅस कटरच्या सहाय्याने एटीएम मशीन फोडण्याचा प्रयत्न केला घटना १३ ऑगस्ट गुरुवारला सकाळी ६ वाजताच्या दरम्यान उघडकीस आली सदर घटनेत एटीएम मशीनचे ३ लाख रुपयांचे नुकसान झाले असून सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गुरुवारला सकाळी ६ वाजताच्या सुमारास घरमालक हिरामण चवरे यांना एटीएममधून अलार्मचा आवाज ऐकू आला यावेळी एटीएम मशीनकडे जाऊन बघितले असता एटीएम मधल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यावर अज्ञात चोरट्यांनी काळ्या रंगाचा स्प्रे मारल्याचे दिसून आले घरमालक हिरामण चवरे यांनी सदर घटनेची माहिती खापरखेडा पोलीसांना व संबंधित बँक प्रशासनाला दिली.

पोलिसानी घटनास्थळाची पाहणी केली असता, चोरट्यांनी गॅस कटरच्या साहाय्याने एटीएम मशीनचा लोखंडी भाग कापून आतील रोकड लंपास करण्याचा प्रयत्न केल्याचे उघडकीस आले चोरीच्या प्रयत्नात एटीएम मशीनचे ३ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मात्र रोख रक्कम चोरीला गेली नसल्याची माहिती मिळाली असून यापूवीर्ही याठिकाणी एटीएम मशीन फोडण्याचा प्रयत्न झाला होता हे विशेष! यासंदर्भात खापरखेडा पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून सीसीटीव्ही फुटेज आधारे चोरट्यांचा शोध सुरू आहे.

## नागपंचमीनिमित्त बाभूळवाडा येथे सोमवारी नागपूजा महोत्सव



दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी

नागपूर जिल्हा अंतर्गत पारशिवनी तालुक्यातील बाभूळवाडा नागठाणा देवस्थान येथे नागपंचमीनिमित्त सोमवारी १७ ऑगस्ट रोजी नागदेव दर्शन व महापुजा यात्रा उत्साहात संपन्न होणार आहे. या निमित्ताने पारशिवनी ते पेंच रोडवरील बाभूळवाडा स्थित नागठाणा देवस्थान आहे.अनेक वर्षांपासून नागपंचमीनिमित्त येथे महायात्रा भरते. नागठाणा देवस्थान प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. या देवस्थानाचे महत्त्व असे की, पूर्वी दुंडाखैरी व बाभूळवाडा शिवारात गवळी लोकांची वस्ती होती. येथील लोक गावखेड्यात जाऊन दही, दूध विकत होते. एकदा गवळी समाजातील सुनबाई दही विकून घरी आल्यावर मडके का जड वाटते म्हणून सुनेने सासूला उचलण्यासाठी बोलाविले. मडके खाली उतरविले तेव्हा मडक्यात प्रत्यक्षात शेषनाग दिसून आला. त्याला बाहेर काढण्यासाठी खूप प्रयत्न केले. मात्र तो बाहेर निघेना. तेव्हा मडक्याभोवती लाकडे ठेवून आग लावण्यात आली. शेषनाग बाहेर निघाला व पळू लागला.

पळताना ज्या दगडावरून तो नागोबा गेला त्या दगडावर शेषनागाच्या वेगवेगळ्या आकाराचे पट्टे व खुणा अजूनही अस्तित्वात असून बघायला मिळतात. अशी आख्यायिका आहे. तेव्हापासून या ठिकाणी श्रावण मासात नागपंचमीला महायात्रा भरते. या परिसरात नैसर्गिक सौंदर्य प्राप्त टेकडीवर चित्रछाया मंदिर, हनुमान मंदिर, नागमंदिर, अशी देवस्थाने आहेत. त्यामुळे येथे एक वेगळेच नैसर्गिक सौंदर्य व पर्यटन प्राप्त झाले आहे. त्यामुळे या यात्रेला महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड व विविध राज्यांतून भाविक दर्शनासह पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी येतात. यावर्षी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होईल. आरती कार्यक्रम तीन वाजता होईल, अशी माहिती भक्त भुजंगराव ढोरे यांनी दिली. स्थानिक प्रशासनाकडून शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी बंदोबस्त करण्यात येणार आहे.

## धरमपेठ झोन अंतर्गत अनधिकृत बांधकामाविरूध्द नोटिस प्रक्रीया सुरू

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिकेच्या धरमपेठ झोन अंतर्गत विविध प्रभागांमध्ये तपासणी आज दिनांक १३ ऑगस्ट रोजी नोटिसीद्वारे संबंधित संस्थांकडून बांधकामाची मंजूर परवानगी, नकाशे, बांधकामासंबंधीची आवश्यक अभिलेख सादर करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या त्या अधिकृत आहे किंवा अनधिकृत आहे, याबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

सदर कारवाईमध्ये अग्निशमन विभाग, एनडीएस व अतिक्रमण विभाग तसेच धरमपेठ झोनचे उपअभियंता व सहाय्यक आयुक्त यांचा समवेत ही कारवाई महापौर व आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेली असून, संबंधित संस्थांनी नोटिसीमध्ये नमूद केलेल्या कालावधीत आवश्यक कागदपत्रे सादर करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

तपासणीदरम्यान बांधकाम अनधिकृत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कायदे व नियमांनुसार नोटीस, बांधकाम थांबविणे, अनधिकृत बांधकाम हटविणे/ पाडणे तसेच आवश्यकतेनुसार इतर वैधानिक कार्यवाही करण्यात येईल.

नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच शहरातील बांधकामांमध्ये कायद्याचे पालन सुनिश्चित करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेची ही कारवाई पुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. कार्यवाही करण्यात नोटीस बजविण्यात आलेल्या संस्थांची नावे खालील प्रमाणे आहे.

श्री. नारायण डेमले, (हॉस्टेल) रविनगर, नागपूर. श्री. पृथ्वीराज अग्रवाल, रामनगर, नागपूर. मे. नारायणा कोचींग सेंटर, अडव्हंस अकेडमी, धरमपेठ, नागपूर. मे. न्यु पराग रेस्टोरंट अँड बार, वर्धा रोड, नागपूर. मे. जे. पी. चेम्बर्स श्री. सारांग देवघरे व इतर, अंबाझरी रोड, नागपूर. मे. ब्राडवे कॉम्पीटेटिव अकडेमी, अभ्यंकर नगर, नागपूर.

## 'गो ग्रीन' चा स्वीकार; नागपूर जिल्ह्यात वीज ग्राहकांची वर्षभरात ३ कोटींची बचत!

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

पर्यावरण रक्षणाचा वसा घेत नागपूर जिल्ह्यातील महावितरणच्या वीज ग्राहकांनी एक आदर्श आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. महावितरणच्या 'गो ग्रीन' या लोकप्रिय योजनेला नागपूरकरांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला असून, कागदी बिलांना पूर्णपणे फाटा देत डिजिटल बिलांचा स्वीकार केला आहे. या पर्यावरणपूरक आणि दूरगामी निर्णयामुळे जिल्ह्यातील जागरूक वीज ग्राहकांनी वषार्ला तब्बल ३ कोटी ५ लाख ९२ हजार ३२० रुपयांची घसघसीत बचत केली आहे.

पर्यावरण संवर्धनाला थेट आर्थिक फायद्याची जोड देणाऱ्या या योजनेअंतर्गत, गो ग्रीनचा पर्याय स्वीकारणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या पहिल्याच बिलात संपूर्ण वर्षासाठीची १२० रुपयांची सवलत (१० रुपये प्रति महिना) एकत्र देण्यात येत आहे. या अत्यंत आकर्षक आणि ग्राहककेंद्री योजनेमुळे नागपूर जिल्ह्यात डिजिटल बिलांचा स्वीकार करणाऱ्या ग्राहकांची संख्या वेगाने वाढून आता विक्रमी २ लाख ५४ हजार ९३६ वर पोहोचली आहे.

पूर्वी या योजनेत सहभागी होणाऱ्या ग्राहकांना दरमहा १० रुपयांची सवलत मिळायची. परंतु, जानेवारी २०२५ पासून महावितरणने नियमात बदल करत, गो ग्रीनचा पर्याय निवडल्याच्या पहिल्याच बिलात पुढील १२ महिन्यांसाठीची संपूर्ण १२० रुपयांची सवलत एकत्र देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. या बदलामुळे जानेवारी २०२५ मध्ये १९ हजार ३७० असलेले ग्राहक जानेवारी २०२६ मध्ये २८ हजार ५०१ पर्यंत पोहोचले आणि आज ही संख्या तब्बल २ लाख ५४ हजार ९३६ च्या टप्प्यावर पोहोचली आहे.

गो ग्रीन योजनेमुळे ग्राहकांना अनेक मोठे फायदे मिळत आहेत. नोंदणीकृत ईमेल, मोबाईलवर एसएमएस आणि व्हॉट्सअपद्वारे दरमहा अचूक वीजबिल अगदी वेळेवर उपलब्ध होते. हे बिल मोबाईल किंवा संगणकात सुरक्षित ठेवता येते, तसेच आवश्यकतेनुसार केव्हाही डाऊनलोड किंवा रंगीत प्रिंट काढण्याची सुविधाही उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, बिलाच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत ऑनलाइन भरणा केल्यास ग्राहकांना अतिरिक्त एक टक्क्यांची सवलत देखील मिळत आहे. या पर्यावरणपूरक प्रवासात सहभागी होणे अतिशय सोपे असून, ग्राहकांनी महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर किंवा मोबाईल अँपवर जाऊन आपला ग्राहक क्रमांक सबमिट करायचा आहे. याद्वारे छापील बिलाची प्रत रद्द होऊन नोंदणीकृत मोबाईल व ईमेलवर दरमहा डिजिटल बिल पाठविण्यात येते. निसर्गाचे जतन आणि घसघसीत आर्थिक बचत साधणाऱ्या या सुवर्णसंधीचा लाभ नागपूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त वीज ग्राहकांनी घ्यावा, कागदी बिलांचा मोह टाळून 'गो ग्रीन'चा पर्याय स्वीकारावा आणि पर्यावरण रक्षणात आपला खारीचा वाटा उचलावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

## ३०० कोटी वृक्षलागवड अभियानाला नागपूर जिल्ह्यात उत्स्फूर्त सुरुवात



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

३०० कोटी वृक्षलागवड - हरित महाराष्ट्र अभियानांतर्गत तसेच विकसित भारत-रोजगार व आजीविका मिशन (ग्रामीण) अंतर्गत नागपूर जिल्ह्यात व्यापक वृक्षलागवड मोहिमेला मंगळवारी उत्स्फूर्त सुरुवात झाली. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये वृक्षलागवड करण्यात आली. नागपूर जिल्ह्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या ५ लाख वृक्षलागवडीच्या तालुकानिहाय उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे. लावण्यात आलेल्या वृक्षांचे जिओ-टॅग लोकेशन नोंदवून ठेवण्याच्या सूचना ग्रामपंचायतींना देण्यात आल्या आहेत.

ग्रामीण भागातील मोकळ्या जागा, महसूल जमीन, गावठाण, गायरान, स्मशानभूमी आणि शाळांच्या परिसरात प्रामुख्याने वृक्षलागवड करण्यात येत आहे. या ५ लाख वृक्षलागवडीपैकी तीन लाख वृक्षांची लागवड विकसित भारत-जी राम जी योजनेअंतर्गत करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत लावलेल्या वृक्षांचे तीन वर्षे संगोपन करण्यासाठी ग्रामपंचायतींना निधी मिळणार आहे. उर्वरित वृक्षांची लागवड ग्रामपंचायती त्यांच्याच निधीतून करणार आहेत.

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात संबंधित विभागप्रमुखांच्या हस्ते वृक्षलागवडीचा शुभारंभ करण्यात आला. भिवापूर येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्या हस्ते कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. यावेळी शालेय विद्यार्थी, ग्रामस्थ, ग्रामपंचायत पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी म्हणाले, विकसित भारत-जी राम जी योजनेअंतर्गत वृक्षलागवड ही केवळ रोपे लावण्याची मोहीम नसून, ग्रामीण भागातील पर्यावरण संवर्धन आणि भविष्यातील पिढ्यांसाठी हरित व शाश्वत भविष्य निर्माण करण्याची चळवळ आहे. नागपूर जिल्ह्याला दिलेले ५ लाख वृक्षलागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करताना लावलेल्या प्रत्येक रोपाचे संरक्षण, संगोपन व जिवंतता टिकविणे तितकेच महत्त्वाचे आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीने घेतलेला पुढाकार आणि शालेय विद्यार्थी व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग ही या अभियानाची खरी ताकद आहे.

### वृक्षांचे 'जिओ-टॅग लोकेशन' नोंदविण्याच्या ग्राम पंचायतींना सूचना

यासंदर्भात माहिती देताना जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) कपिलनाथ कलोडे यांनी सांगितले की, लावण्यात आलेल्या वृक्षांचे जिओ-टॅग लोकेशन नोंदवून ठेवण्याच्या सूचना ग्रामपंचायतींना देण्यात आल्या आहेत. पुढील वर्षी या वृक्षलागवडीचा आढावा घेण्यात येणार आहे. नागरिकांनीही या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

## अतिक्रमण हटविण्यासाठी हिवरावासियांचे उपविभागीय अधिकारी व तहसीलदार मौदा यांना निवेदन



दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी

गट ग्रामपंचायत आदासा अंतर्गत येत असलेल्या हिवरा गावातील शासकीय जमिनीवरील अतिक्रमण तातडीने हटविण्यासाठी बुधवार (ता. १२ ऑगस्ट) ला उपविभागीय अधिकारी व तहसीलदार मौदा यांना ग्रामस्थांमार्फत निवेदन देण्यात आले. निवेदनाच्या प्रतिलिपी पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनाही देण्यात आले आहे.

हिवरा येथील गट क्रमांक ५६ मधील आराजी ३.४० हेक्टर शासकीय जमीन असल्याचा उल्लेख तहसीलदार कार्यालयाकडून देण्यात आलेल्या पत्रात करण्यात आला आहे. सदर जमीन महाराष्ट्र शासनाच्या नावावर असून, संबंधित जमिनीचा शासकीय अभिलेखात उल्लेख असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या जमिनीवर कापूस पीक घेतले जात असल्याबाबत तहसील कार्यालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटविण्यासाठी ग्रामपंचायतीकडून तसेच नागरिकांकडून प्रशासनाकडे यापूर्वी अनेकदा निवेदने देण्यात आली.

विशेष म्हणजे, या प्रकरणी ता. २९ जून २०२६ रोजी तहसील कार्यालयाने संबंधितांना शासकीय जमिनीवर कोणत्याही प्रकारची पिकाची लागवड करू नये तसेच अतिक्रमण करू नये, याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश दिल्याचे पत्रात नमूद आहे. मात्र, या प्रकरणात अपेक्षित ती कठोर कार्यवाही झालेली नसल्याने, बुधवार ता. १२ ऑगस्टला हिवरा गावातील शेकडो ग्रामस्थ स्वतः उपविभागीय अधिकारी व तहसील कार्यालयात जाऊन निवेदन दिले.

याप्रसंगी गट ग्रामपंचायत आदासा सरपंच संजय आतीलकर, उपसरपंच आकाश मारबदे, माजी सरपंच श्रीमती सुनीता मधुकर जगनाडे, ग्रामस्थ विजय शेंडे,संजय शेंडे सह शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते. अतिक्रमण हटविण्याची कारवाई तातडीने न केल्यास उपविभागीय अधिकारी व तहसील कार्यालय समोर उपोषणाचा इशारा निवेदनकर्त्यांनी दिला आहे. उपोषणाला सुरुवात होण्यापूर्वी हिवरा गावातील अतिक्रमण हटविण्यात संबंधित प्रशासनाला यश येते की अपयश? याकडे संपूर्ण मौदा तालुकावासियांचे लक्ष वेधले आहे, हे विशेष!

थोडक्यात

## अवयवदान जनजागृती कार्यक्रम १६ ऑगस्ट रोजी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अवयवदान दिनानिमित्त अवयव व ऊतीदानाबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन रविवार, १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत, इंडियन मेडिकल असोसिएशन ऑडिटोरियम, आयएमए हाऊस, नॉर्थ अंबाझरी रोड, नागपूर येथे करण्यात आले आहे. असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडिया, विदर्भ चॅप्टर यांच्या वतीने इंडियन मेडिकल असोसिएशन, नागपूर शाखा; झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर, नागपूर; अकॅडमी ऑफ मेडिकल सायन्सेस; नेफ्रोलॉजी सोसायटी; तसेच सोसायटी ऑफ क्रिटिकल केअर मेडिसिन, नागपूर यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

नागपूर शहराचे पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील प्रमुख पाहुणे, तर एक्सझेडसीसी नागपूरचे प्रमुख मनीष श्रीगिरीवार सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. अवयव व ऊती दानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवणे, अवयवदाना बाबतचे मिथक व गैरसमज दूर करणे तसेच अवयवदानाचा संकल्प याबाबत माहिती देणासाठी आयोजित या कार्यक्रमात अवयवदते व प्रत्यारोपण झालेले रुग्ण आपले अनुभव मांडतील.

## 'मराठी पाऊल पडते पुढे' १६ ऑगस्ट रोजी

### सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे स्वातंत्र्यदिनानिमित्त विशेष प्रस्तुती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने 'मराठी पाऊल पडते पुढे..!!' या संगीत, नाट्य व नृत्यमय विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता बी.आर.ए. मुंडले, प्लॅटिनम ज्युबिली सभागृह, दीक्षाभूमीजवळ, नागपूर येथे करण्यात आले आहे. या विनामूल्य कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे संयोजन अमर कुळकर्णी करणार असून, संगीत नियोजन आनंद मास्टे यांचे आहे. कार्यक्रमाचे समन्वयक गजानन रानडे आहेत. संतपरंपरा, लोककला, लोकसंस्कृती, सामाजिक चळवळी, विविध सण-उत्सव, परंपरा आणि समाजजीवनाच्या विविध पैलूंनी महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख घडविली आहे. या समृद्ध वारशाचे दर्शन घडविताना महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीचा प्रवास कलात्मक माध्यमातून रसिकांसमोर मांडण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे.

## गणेशोत्सवात रंगणार सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

### खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे गणेश मंडळे व कला संस्थांना नोंदणीचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून कला, साहित्य, संस्कृती आणि परंपरांचा प्रचार-प्रसार व्हावा तसेच गणेशोत्सवाच्या माध्यमातून विविध गणेश मंडळांना सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, नागपूरच्या वतीने गेल्या चार वर्षांपासून शहरात सांस्कृतिक गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. यंदाही गणेशोत्सवादरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करू इच्छिणाऱ्या स्थानिक गणेश मंडळांनी आपली नावे तातडीने नोंदवावीत, असे आवाहन खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत भक्तिसंगीत, सुगम संगीत, देशभक्तिपर गीते, हास्य कविसंमेलन, जागरण, गोंधळ, कीर्तन, लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य, एकपात्री प्रयोग, नाट्यप्रयोग, नकला, गीत रामायण, जादूचे प्रयोग, रांगोळी प्रशिक्षण वर्ग, मेंदी प्रशिक्षण वर्ग, कथाकथन आदी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करता येणार आहे. इच्छुक गणेश मंडळांनी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत नोंदणी करावी. तसेच, विविध कला संस्थांनी आपल्या कार्यक्रमांची नोंदणी ५ सप्टेंबर २०२६ पर्यंत करावी, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे. नोंदणी तसेच अधिक माहितीसाठी २० ऑगस्टपासून दररोज दुपारी १२ ते ३ या वेळेत नितीन गडकरी यांचे जनसंपर्क कार्यालय, महाल, नागपूर येथे संपर्क साधावा.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी खासदार सांस्कृतिक महोत्सव आयोजन समिती, नागपूरचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, उपाध्यक्ष डॉ. गौरीशंकर पाराशर, डॉ. दीपक खिरवडकर, अशोक मानकर, दिलीप जाधव, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, सदस्य बाळासाहेब कुलकर्णी, हाजी अब्दुल कदीर, सारंग गडकरी, अविनाश घुशे, संदीप गवई, संजय गुळकरी, रेणुका देशकर, गुड्डू त्रिवेदी, किशोर पाटील, चेतन कायरकर, आशिष वांदिले, भोलानाथ सहारे, ॲड. नितीन तेलगोटे, मनिषा काशीकर, विजय फडणवीस, महेंद्र राऊत, दिलीप गौर, शैलेश ढोबळे, संजय बंगाले, अतुल गुरू, योगेश बन, राजू कनाटे यांचे सहकार्य लाभत आहे.

# शहरातील ५१८ भाग्यवंतांच्या घरांची स्वप्नपूर्ती




### महापौर, आयुक्त व इतर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते संगणकीय पद्धतीने सोडत

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शहरातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत परवडणारी घरे स्वप्नपूर्ती योजनेत नारा-नारी भागात उभारण्यात येणाऱ्या ५१८ सदनिकांची महापौर निता ठाकरे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते कविवर्य सुरेश भट सभागृहात संगणकीय पद्धतीने आज (ता. १३) सोडत काढण्यात आली.

यावेळी उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, आयुक्त डॉ. विपीन, दुर्बल घटक समितीच्या सभापती कु. लक्ष्मी हत्तीठेले, गलिच्छ वस्ती निर्मूलन व घरबांधणी विशेष समितीच्या सभापती रुतिका मसराम, स्थापत्य व प्रकल्प विशेष समितीच्या सभापती अश्विनी जिचकार, हनुमाननगर झोनच्या सभापती ज्योती देवघरे, नगरसेविका मानसी सिमले, अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, मुख्य अभियंता लिना उपाध्ये, अधीक्षक अभियंता विजय गुरुबक्षानी, कार्यकारी अभियंता सुनील उईके, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी स्वप्निल लोखंडे, प्रतिक गजभिये या योजनेचे विकासक गौरव अग्रवाल उपस्थित होते.

**अडीच लाखांचे अनुदान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सर्वांसाठी घर या योजनेअंतर्गत शहरातील दुर्बल घटकातील नागरिकांना घरे उपलब्ध करून देण्याची योजना शहराच्या विविध भागात राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत नारा-नारी भागात १ बीएचके व २ बीएचके सदनिका प्रकल्पाचे भूमिपूजन झाले आहे. यासाठी नागरिकांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविले होते. यासाठी १९१९ अर्जदारांनी सदनिकांसाठी अर्ज केले होते. यात १ बीएचके सदनिका २१० तर २ बीएचके सदनिका ३०८ बांधण्यात येणार आहे. १ बीएचके १५ लाख तर २ बीएचके २१ लाख रुपयांमध्ये उपलब्ध होणार आहे. यासाठी नागरिकांना अडीच लाख रुपयांचे अनुदान सुद्धा मिळणार आहे.

**सोडत पाहण्यासाठी गर्दी**

संगणकीय पद्धतीने झालेल्या या सोडतीसाठी कविवर्य सुरेश भट सभागृहात गर्दी केली होती. ज्यांचे नाव सोडतीमध्ये आले त्यांना तात्काळ एसएमएसने सूचित करण्यात आले आहे. या योजनेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी प्रवर्ग तसेच दिव्यांगांसाठी सदनिकांचे आरक्षण होते. नागरिकांनी ज्या प्रवर्गातून सदनिकांसाठी अर्ज केले होते. त्या सर्वांचे नावे संगणकात फिड करण्यात आले. यानंतर रिमोटचा वापर करून संगणकात फिड केलेल्या डाटातून रँडम पद्धतीने ही प्रक्रिया पार पडली.

सोडत चार गटात विभागली होती. यात दिव्यांग आरक्षित, दिव्यांग अनारक्षित, एससी, एसटी व ओबीसी आरक्षित तसेच अनआरक्षित अशा गटांचा समावेश होता. सोडत लागलेल्या काही भाग्यवंतांचा महापौर निता ठाकरे व आयुक्त डॉ. विपीन यांच्या हस्ते तुळशीचे रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. सोडत निघाल्यानंतर लगेच मोठ्या स्क्रिनवर लाभार्थ्यांची नावे झळकविण्यात आली. सोडतीच्यावेळी लहान बालकांना व्यासपीठावर पाचारण करण्यात आले होते.

**सर्वांना घरे देण्याचा मानस : महापौर**

यावेळी बोलताना महापौर निता ठाकरे म्हणाल्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सर्वांसाठी घर या संकल्पेनेची पूर्तता करण्याच्या वाटचालीतील हा एक टप्पा आहे. या योजनेसाठी १९१९ जणांनी अर्ज केले होते. त्यापैकी ५१८ भाग्यवंतांना सदनिका मिळाल्या. उर्वरित लोकांनी नाराज होण्याची आवश्यकता नाही. पुनापूर, हुडकेश्वर भागात सुद्धा या प्रकारे सदनिका उभारण्यात येणार आहे. सर्वांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी नागपूर मनपा कटिबद्ध आहे. घर नाही, असा कुणीही व्यक्ती नागपुरात राहणार नाही, यासाठी यापुढे प्रयत्न करण्यात येईल, असेही ठाकरे म्हणाल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी केले. यावेळी त्यांनी या प्रकारे योजना राबविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेचे स्वागत केले. महापौर निता ठाकरे यांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे सुरूवात केली. तुळशीचे रोपटे देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

**मनपाच्या संकेतस्थळावर यादी उपलब्ध**

संगणकीय सोडत कशा प्रकारे काढण्यात येणार आहे, यासंदभार्तील सर्व माहिती एका चित्रफितीद्वारे नागरिकांना सोडत सुरू होण्यापूर्वी दाखविण्यात आली. याचवेळी प्रतिक्षा यादीत असलेल्यांची यादीची सोडत काढण्यात आली. ज्या भाग्यवंतांची नावे आजच्या सोडतीमध्ये आली आहे. त्यांची नावे मनपाच्या संकेतस्थळांवर सुद्धा उपलब्ध आहे. यात त्यांच्या सदनिकांचे क्रमांकही नमूद केले आहेत. दिव्यांगांना तळमजल्याच्या सदनिका उपलब्ध करून दिल्या आहेत. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनी केले तर आभार मुख्य अभियंता लिना उपाध्ये यांनी मानले.

## जिल्हास्तरीय रानभाजी व सेंद्रीय उत्पादन विक्री महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

### २ लाख ८०० रुपयांची विक्री

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), नागपूर व कृषी विभाग नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय रानभाजी व सेंद्रीय उत्पादन विक्री महोत्सवाला नागपूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कृषि राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या प्रेरणेने दिनांक १३ व १४ ऑगस्ट रोजी रामनगर मैदान, नागपूर येथे आयोजित या दोन दिवसीय जिल्हास्तरीय रानभाजी व सेंद्रीय उत्पादन विक्री महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते करण्यात आले. पहिल्याच दिवशी रानभाजी व सेंद्रिय उत्पादनांची दोन लाख ८०० रुपयांची विक्री झाली.

जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी विविध नैसर्गिक शेतमाल व रानभाजी उत्पादक शेतकरी गटांच्या स्टॉलला भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी शेतकरी गटांना प्रोत्साहन देत सेंद्रिय शेती, स्थानिक रानभाज्या आणि पारंपरिक अन्नपद्धतीचे महत्त्व अधोरेखित केले.

याप्रसंगी जिल्ह्यातील सेंद्रिय शेतीमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा सत्कार शिवभागीय कृषी सहसंचालक उमेश घाटगे यांच्या हस्ते करण्यात आला. आत्मा नागपूरच्या प्रकल्प संचालक डॉ. अर्चना कडू, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नागपूर प्रज्ञा गोळघाटे यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील



विविध शेतकरी गटांनी रानभाज्या, नैसर्गिक शेतीमाल, भाजीपाला व अन्य कृषी उत्पादने महोत्सवात विक्रीसाठी आणली होती.

महोत्सवातील विशेष आकर्षण ठरलेल्या रानभाज्यांचे महत्त्व, त्यांचे पौष्टिक गुणधर्म, पारंपरिक उपयोग आणि दैनंदिन आहारातील स्थान याबाबत ६५ शेतकरी गटांनी नागपूर शहरातील नागरिकांशी थेट संवाद साधला. ग्रामीण भागातील शेतकरी आणि शहरातील ग्राहक यांच्यात थेट संपर्क निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला चांगली बाजारपेठ मिळाली.

महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकल्प उपसंचालक आत्मा पल्लवी तलमले, जिल्ह्यातील सर्व एटीएम, बीटीएम तसेच कृषी विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. उपविभागीय कृषी अधिकारी दत्तात्रय येळे, बळीराम सातपुते तसेच तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते.

## १६ ऑगस्टला 'सप्तरंगी इंद्रधनू'चे प्रकाशन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सुरेखा बोरकर यांच्या "सप्तरंगी इंद्रधनू" काव्यसंग्रहाचे प्रकाशन साहित्य कला सेवा मंडळाच्या '५६ व्या वर्धापन दिना'च्या सोहळ्यात रविवार दिनांक १६ ऑगस्ट २०२६ रोजी भाऊसाहेब शेवाळकर




सभागृह, नागपूर येथे करण्यात येणार आहे. काव्यसंग्रहाचे प्रकाशन राजेश काकडे (संस्थापक अध्यक्ष, राष्ट्रीय जनसुराज पार्टी), डॉ. शरदराव निंबाळकर (ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ), डॉ. देवीदास इंदापवार, माजी अध्यक्ष यांचे हस्ते होणार आहे. 'सप्तरंगी इंद्रधनू' या काव्यसंग्रहाला भंडारा येथील संत साहित्याचे अभ्यासक व सेवानिवृत्त प्राचार्य, डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे यांची अभ्यासू आणि चिंतनशील प्रस्तावना असून नागपूर येथील सुप्रसिद्ध ब्लर्बकार प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त' यांनी काव्यसंग्रहाची आस्वादनपूर्ण पाठराखण केली आहे.

तसेच 'शब्दशिल्प' प्रकाशनचे संपादक कलाम अहमद खान यांनी काव्यसंग्रहाची सर्वांगसुंदर निर्मिती केली आहे. साहित्य कला सेवा मंडळातर्फे काव्यसंग्रहाचे प्रकाशन होत असल्याबद्दल कवयित्री सुरेखा बोरकर यांनी मंडळाचे अध्यक्ष आणि कार्यकारिणी सदस्यांचे मनापासून आभार मानले आहे तसेच या कार्यक्रमात मेजर हेमंत जकाते व लोकमाता प्रा. सुलभा जकाते पुरस्कृत 'जीवन गौरव पुरस्कारा'ने डॉ. आशाताई पांडे (अध्यक्ष, साहित्य विहार संस्था, नागपूर) यांना गौरवान्वित करण्यात येणार आहे, हे विशेष!

## श्रींच्या दर्शनासाठी नागपूर ते शेगाव पायदळ दिंडी यात्रा १८ ऑगस्टपासून मार्गस्थ

### निर्मलनगरी येथील संत गजानन महाराज सेवा ट्रस्टच्यावतीने आयोजनाचे हे २५ वे वर्ष

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर (देवराव प्रधान)**

उमरेड मार्गावरील निर्मल नगरी येथील श्री संत गजानन महाराजांच्या नामस्मरणाने आणि भक्तीच्या अखंड गजराने नागपूर शहरातून शेगावकडे जाणाऱ्या पायदळ दिंडी यात्रेचे आयोजन निर्मलनगरी येथील संत गजानन महाराज सेवा ट्रस्टच्यावतीने हे २५ वे वर्ष असून ही पवित्र दिंडी यात्रा १८ ऑगस्ट रोजी, सकाळी संत गजानन महाराज मंदिरातून प्रस्थान करणार आहे.

सुमारे ३२० किलोमीटरचा दहा दिवसांचा हा पायी प्रवास भक्तिमय वातावरणात पार



पडणार आहे. दिंडी यात्रेदरम्यान शिस्त, सेवा आणि वारकरी परंपरेचे दर्शन घडणार असून, मोठ्या संख्येने भाविक सहभागी होणार आहेत. टाळ-मृदंगाच्या निनादात, संतांच्या नामघोषात आणि हरिनामाच्या गजरात दिंडीचा प्रवास होणार आहे. या दिंडीत वारकरी, पताकाधारी, टाळकरी, वीणेकरी तसेच कीर्तनकार आणि गायकांचा ताफा दिंडीचे आकर्षण ठरणार असून यातील सहभाग राहणार आहे. असा राहणार दिंडीचा मार्ग १८ ऑगस्ट रोजी पहाटे ४ वाजता श्रींची आरती झाल्यानंतर सकाळी ५ वाजता दिंडीचे प्रस्थान होईल. त्यानंतर दिंडीचा प्रवास टप्प्याटप्प्याने शेगावच्या दिशेने सुरू राहणार आहे.

१९ ऑगस्ट रोजी बाजारगाव ते जगदंबा माता मंदिर, २० ऑगस्ट रोजी दत्त मंदिर तळेगाव, २१ ऑगस्ट रोजी दासटेकडी, २२ ऑगस्ट रोजी संत सभागृह नांदगावपेठ, २३ ऑगस्ट रोजी नांदगावपेठ ते म्हैसूर, २४ ऑगस्ट रोजी म्हैसूर ला मुक्काम राहील. त्यानंतर २५ ऑगस्ट रोजी संत गुलाबबाबा आश्रम हिंगणी, २६ ऑगस्ट रोजी आडसूड, तर २७ ऑगस्ट रोजी आडसूड ते श्रीक्षेत्र शेगाव असा प्रवास होईल. शेगाव येथे दर्शन व मुक्कामानंतर २८ ऑगस्ट रोजी पहाटे ५ वाजता श्री संत गजानन महाराजांचे दर्शन घेऊन राखी अर्पण करण्यात येणार आहे.

त्यानंतर सर्व वारकरी नागपूरकडे परतीचा प्रवास करतील. दिंडीच्या संपूर्ण प्रवासादरम्यान विविध ठिकाणी भजन, कीर्तन, हरिपाठ तसेच सामूहिक प्रार्थनेचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे संपूर्ण दहा दिवसांचा प्रवास भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरणात पार पडणार आहे. एकात्मता, सेवा आणि अध्यात्माचा संदेश श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी आयोजित करण्यात आलेली ही पायदळ दिंडी केवळ धार्मिक यात्रा नसून एकात्मता, सेवा, शिस्त आणि अध्यात्मिक संस्कारांचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणारी भक्तीची परंपरा आहे.

नागपूर ते शेगाव या सुमारे ३२० किलोमीटरच्या प्रवासात भाविक संत गजानन महाराजांच्या चरणी आपली श्रद्धा अर्पण करणार आहेत. दिंडीच्या आयोजना मुळे नागपूर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, अधिकाधिक भाविकांनी या पवित्र यात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन निर्मल नगरी येथील श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

थोडक्यात

## ललित साहित्याचा संवेदनशील लेखक हरपला

### विदर्भ साहित्य संघातर्फे श्रीनिवास कुलकर्णी यांना श्रद्धांजली



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मराठी ललित साहित्याला आपल्या वैशिष्ट्यपूर्ण लेखनातून समृद्ध करणारे ज्येष्ठ साहित्यिक, चित्रकार आणि मौजचे माजी संपादक श्रीनिवास कुलकर्णी यांच्या निधनाने साहित्यविश्वाची मोठी हानी झाली आहे, अशा भावना व्यक्त करत विदर्भ साहित्य संघातर्फे गुरूवारी त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. श्रद्धांजली सभेला कवी वसंत वाहोकार, कथा कादंबरीकार विजया ब्राम्हणकर यांच्यासह मेघना वाहोकार, विदर्भ साहित्य संघाचे सरचिटणीस विलास मानेकर, स्वाती मोहरीर, वृषाली देशपांडे आदींची उपस्थिती होती. श्रीनिवास कुलकर्णी हे मोजकीच पुस्तके लिहूनही मराठी साहित्यात आपला स्वतंत्र ठसा उमटविणारे मोठे लेखक होते. त्यांच्या लेखनात काव्यमयता, चित्रमय शैली, वैशिष्ट्यपूर्ण भाषेचा वापर आणि जीवनातील अनुभवांचे उत्कट चित्रण दिसून येते. डोह, सोन्याचा पिंपळ आणि कोरडी भिक्षा पाणी यांसारख्या साहित्यकृतींमधून त्यांनी मराठी साहित्याला समृद्ध केले, असे मत वसंत वाहोकार यांनी व्यक्त केले.

श्रीनिवास कुलकर्णी यांच्या लेखनात लालित्याबरोबरच कवित्व, संवेदनशीलता, सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि विलक्षण कल्पनाशक्ती होती. मनातल्या उन्हात या पहिल्या ललित लेखापासून सुरू झालेला त्यांचा साहित्यिक प्रवास डोह, सोन्याचा पिंपळ यांसारख्या साहित्यकृतींमधून समृद्ध झाला, असे विजय ब्राम्हणकर म्हणाल्या. शांत, संयमी आणि संवेदनशील लेखक असलेले कृष्णाकाठचे औदुंबर श्रीनिवास कुलकर्णी आपल्या लेखनातून कायम अमर राहतील, असे म्हणत त्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन शुभदा फडवणीस यांनी केले.

## वसतिगृह प्रवेश प्रक्रियेकरीता १५ सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन अर्जाची मुदत

### 'स्वाधार' योजनेचा लाभ हवा असेल तर हा अर्ज ठरणार अनिवार्य

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत नागपूर विभागातील नागपूरमध्ये २५, वर्धा १० भंडारा ९ गोंदिया ८, चंद्रपूर ११, गडचिरोली ७ अशा एकूण ७० शासकीय वसतिगृहांची शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने अधिकृतपणे सुरू झाली आहे. इच्छुक व पात्र लाभार्थ्यांनी नियोजित वेळेत https://hmasnew.mahait.org या पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रसाद कुळकर्णी, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग नागपूर यांच्या वतीने करण्यात आले आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख १५ सप्टेंबर २०२६ आहे.

'स्वाधार योजने साठी वसतिगृह अर्ज अनिवार्य अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात जागा उपलब्ध होणार नाही, त्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ ऑनलाइन पद्धतीने दिला जाईल. मात्र, ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज केलेला असेल, त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. ज्यांचा वसतिगृहात प्रवेश झालेला नाही, परंतु वसतिगृहासाठी पात्र आहेत, अशा विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेता येणार आहे. ज्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना शासकीय वसतिगृहात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्यांनी लवकरात लवकर वर दिलेल्या लिंकवर नियोजित वेळेत अर्ज सादर करावे. अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा.

## नगर प्रशासनाचा गजब कारभार, मृत वानराचे शव चक्क कचरागाडीत

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

करंट लागून मृत झालेल्या माकडाला कचऱ्याच्या गाडीतून नेले जात असल्याचे हितेश बनसोड यांना कळताच त्यांनी वन्यप्राण्यांच्या



विषयी नगर प्रशासनाच्या निष्ठूर भावनांचा निषेध करत स्वताः सदर माकडाला वनपरिक्षेत्र खापा येथील अधिकारी यांच्या सुपुर्द केले. मिळालेल्या माहितीनुसार सकाळी सुमारे १० वाजता करंट लागून एका वानराचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली. घटनेची माहिती मिळताच नगरपरिषद सावनेर प्रशासनाला याबाबत कळविण्यात आले. मात्र, त्यानंतर नगरपरिषद सावनेरच्या कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनातून मृत वानराला नेण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. हा प्रकार लक्षात येताच सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांनी तत्काळ हस्तक्षेप करून मृत वानराला आपल्या ताब्यात घेत वन्यजीवाची होत असलेली अवहेलना टाळली व घटनेची माहिती वनविभागाचे अधिकारी विजय गंगावणे यांना देण्यात आली. वनविभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती मिळताच मृत वानराला वनविभागाच्या ताब्यात देण्यात आला. वन्यजीव असलेल्या वानराचा मृतदेह सामान्य कचऱ्यासोबत नेणे कितपत योग्य आहे, असा गंभीर प्रश्न या घटनेमुळे उपस्थित झाला आहे. मृत वन्यजीवाची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्याऐवजी कचऱ्याच्या वाहनातून वाहतूक करणे हा नगरपरिषद प्रशासनाचा निष्काळजीपणा आहे का..? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकाराची नगरपरिषद प्रशासनाने गंभीर दखल घेऊन मृत वन्यजीवांच्या हाताळणी व विल्हेवाटीबाबत योग्य कार्यपद्धती निश्चित करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांनी केली आहे.

# ठेवी परताव्यावर गंभीर प्रश्नचिन्ह : निर्मल उज्ज्वल सोसायटी विरोधात खातेदारांची पोलिसांत धाव

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

निर्मल उज्ज्वल को-ऑपरेटिव्ह सोसायटी मल्टीस्टेट, नागपूरच्या बल्लारपूर शाखेतील खातेदारांना मागील तीन ते चार महिन्यांपासून त्यांच्या खात्यातील रक्कम मिळण्यात अडचणी येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. वारंवार शाखेत जाऊनही समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याने संतप्त झालेल्या खातेदारांनी अखेर पोलिस ठाणे गाठून तक्रार



दाखल केली.

संस्थेच्या संबंधित पदाधिकाऱ्यांसह बल्लारपूर शाखेच्या व्यवस्थापकाविरुद्ध कारवाई करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आल्याची माहिती आहे. या वेळी मोठ्या संख्येने खातेदार व नागरिक पोलिस ठाण्यात उपस्थित होते.

खातेदारांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी कष्टाने जमा केलेली बचत या संस्थेत ठेवली आहे. मात्र गेल्या काही महिन्यांपासून स्वतःच्या खात्यातील पैसे काढताना अडचणी निर्माण होत आहेत. रक्कम मिळण्यासाठी शाखेत वारंवार चकरा मारूनही वेगवेगळी कारणे सांगितली जात असल्याचा आरोप खातेदारांनी केला.

### ज्येष्ठ नागरिक, महिला आर्थिक अडचणीत

ठेवीची रक्कम वेळेवर मिळत नसल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला आणि सर्वसामान्य बचतदार आर्थिक अडचणीत सापडल्याचे खातेदारांनी सांगितले. आपल्या हक्काचे पैसे मिळविण्यासाठी अनेकदा शाखेत जाऊनही तोडगा न निघाल्याने खातेदारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.या पार्श्वभूमीवर खातेदारांनी एकत्र येत संस्थेच्या संबंधित पदाधिकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच खातेदारांच्या ठेवी सुरक्षित असून त्या तातडीने परत मिळाव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

### शेकडो खातेदारांचे पैसे अडकले

प्रकरणामुळे बल्लारपूर शहरात चर्चेला उधाण आले असून, मोठ्या संख्येने खातेदारांनी एकत्र येत आपल्या ठेवी परत मिळवून देण्याची मागणी केली आहे. संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून खातेदारांचे आर्थिक हित सुरक्षित करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.दरम्यान, पोलिसांकडे तक्रार दाखल झाल्यानंतर या प्रकरणात कोणती कायदेशीर कारवाई केली जाते, याकडे खातेदारांचे लक्ष लागले आहे. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची भूमिका तसेच पोलिस तपासातून नेमके काय निष्पन्न होते, यानंतरच या प्रकरणाचे पुढील चित्र स्पष्ट होणार आहे.

## महिलांच्या आनंदाला नवी उभारी

### मनपाच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाद्वारे महिलांसाठी प्रथमच आयोजन, मनपातर्फे 'महापौर श्रावण उत्सव सोहळा' उत्साहात साजरा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेतर्फे महिलांना त्यांच्या दैनंदिन धकाधकीच्या जीवनातून काही क्षण स्वतःसाठी आनंदाने जगता यावेत, मैत्रिणींसोबत हसता-खेळता यावे आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश अधिक बळकट व्हावा, या उद्देशाने महापौर श्रावण उत्सव सोहळा बजेरिया येथील वंदे मातरम् उद्यान उत्साहात पार पडला. महापौर निता ठाकरे यांच्या संकल्पनेतून आयोजित या सोहळ्यात महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे मनपाच्या क्रीड




व सांस्कृतिक विभागाद्वारे पहिल्यांदाच महिलांसाठी अशा प्रकारच्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. कार्यक्रमात स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, अग्निशमन आणि विद्युत सभापती रुपाली ठाकूर, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभापती मनीषा अतकरे, नगरसेविका वैशाली उदापूरकर, सारिका नांदुरकर, कल्पना शर्मा, रेखा निमजे, दिव्य धुरडे, प्रमिला गौर, ममता ठाकूर, क्रीडा विभागाच्या उज्वला चरडे, कार्यकारी अभियंता सविता गणोरकर यांच्यासह मनपाचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

महापौर निता ठाकरे यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना महापौर म्हणाल्या की, श्रावण उत्सव केवळ पूजा-अर्चना किंवा उपवासापुरता मर्यादित नसून, तो स्त्रीशक्ती, तिचे कर्तृत्व आणि तिच्या आनंदाचा उत्सव आहे. वर्षभर घर, मुलं आणि कामाच्या जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या महिलांना स्वतःसाठी वेळ मिळावा आणि त्या मनमोकळेपणाने या उत्सवाचा आनंद घेऊ शकाव्यात, यासाठी हा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

## ४० वर्षाहून अधिक काळ जनसेवेला वाहून घेतलेले शंकरलाल मडावी

### सामाजिक, राजकीय, सहकार व धार्मिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची प्रदीर्घ परंपरा

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजु फुंडे**

तालुक्यातील जमाकुडो येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शंकरलाल गुणेजी मडावी यांनी गेल्या ४० वर्षांहून अधिक काळापासून सामाजिक, राजकीय, शासकीय, सहकार आणि धार्मिक क्षेत्रात सक्रिय राहून जनसेवेचा वसा जपला आहे. ग्रामीण व आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने कार्य करणारे शंकरलाल मडावी हे परिसरातील अनुभवी सामाजिक नेतृत्व म्हणून परिचित आहेत.

शंकरलाल गुणेजी मडावी यांचा जन्म ६ एप्रिल १९५७ रोजी जमाकुडो, पोस्ट दरेकसा, ता. सालेकसा, जि. गोंदिया येथे झाला. त्यांनी सन १९७३ मध्ये एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण केली. शेती हा त्यांचा व्यवसाय असून गोंडी व छत्तीसगढी या मातृभाषांसोबतच हिंदी, मराठी व इंग्रजी भाषेचेही त्यांना ज्ञान आहे.

### राजकीय क्षेत्रात विविध पदांवर कार्य

सन १९८४ पासून त्यांच्या सामाजिक व राजकीय कायार्ला सुरुवात झाली. ग्रामपंचायत जमाकुडोचे सरपंच म्हणून त्यांनी १९८४ ते १९९२, १९९२ ते १९९७ तसेच २००७ ते २०१२ या कालावधीत जबाबदारी सांभाळली. सन १९९७ ते १९९९ या काळात ते जिल्हा परिषद सदस्य होते. तसेच २००७ ते



२०१२ या कालावधीत तहसील सरपंच संघटनेचे अध्यक्ष आणि जिल्हा सरपंच संघटनेचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी कार्य केले.

### शासकीय समित्यांमध्येही सक्रिय सहभाग

शंकरलाल मडावी यांनी विविध शासकीय समित्यांवर काम करताना जनतेशी संबंधित प्रश्न मांडले. संजय गांधी निराधार तहसील समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी २००१ ते २००४ आणि २०२३ ते २०२४ या काळात काम केले. महाराष्ट्र विद्युत मंडळ तहसील सल्लागार समिती, तहसील रोजगार हमी समिती, जिल्हा दक्षता व सनियंत्रण समिती, तहसील विकास समिती आदी विविध समित्यांमध्ये सदस्य म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडली.

ग्राम वनहक्क समिती जमाकुडोचे अध्यक्ष, विविध शाळा व्यवस्थापन समित्यांचे अध्यक्ष तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र दरेकसा येथील रुग्ण कल्याण समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

### सहकार क्षेत्रात उल्लेखनीय योगदान

सहकार क्षेत्रातही शंकरलाल मडावी यांचे दीर्घकाळापासून योगदान आहे. आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित दरेकसाचे अध्यक्ष म्हणून ते सन २०११ पासून कार्यरत आहेत. तसेच सन २०१६ पासून जिल्हा आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था संघ, गोंदिया जिल्हा याचे अध्यक्ष म्हणून ते कार्यरत आहेत.

### आदिवासी समाजाच्या विकासासाठी सातत्यपूर्ण कार्य

सामाजिक क्षेत्रात त्यांनी अखिल भारतीय आदिवासी पीपल्स फेडरेशनचे जिल्हा संघटक, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद तहसील सालेकसाचे अध्यक्ष तसेच अखिल भारतीय गोंड समाजाचे संघटक म्हणून काम केले आहे. आदिवासी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठविला आहे.

### धार्मिक व सामाजिक कार्यातही योगदान

कचारगड (धनेगाव) येथील पारी कोपार लिंगो मां काली कंकाली देवस्थान समितीशी त्यांचा दीर्घकाळापासून संबंध असून त्यांनी अध्यक्ष व सहसचिव म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे. मां गडमाता मंदिर ट्रस्ट सालेकसा तसेच पंचमुखी हनुमान मंदिर, जामडी/पाटेश्वर धाम यांच्याशीही त्यांचा संबंध आहे.

### विविध पुरस्कारांनी गौरव

समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी विकास मंत्रालयातर्फे त्यांना आदिवासी सेवक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. सन १९९५ मध्ये अखिल भारतीय सरपंच संमेलन, नवी दिल्ली येथे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांची निवड झाली होती. तसेच लोकमत पत्र समूहाकडून सामाजिक क्षेत्रातील सन्मानपत्र, सर्वशिक्षा अभियान महाराष्ट्र शासनाचे प्रशस्तिपत्र आणि यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे यांच्याकडून सन्मानपत्र प्राप्त झाले आहे.

सन २००९ मध्ये आमगाव विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवत त्यांनी सुमारे १८ हजार मते मिळविली. सन २०२४ मध्येही त्यांनी आमगाव विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढविली. गेल्या ४० वर्षांहून अधिक काळ जनसेवा, आदिवासी समाजाचा विकास, ग्रामीण भागातील प्रश्न आणि सामाजिक बांधिलकी या भावनेतून कार्यरत राहिलेले शंकरलाल गुणेजी मडावी यांचा सार्वजनिक जीवनातील प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## नबीरा महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाकडुन अन्नातील भेसळ विषयावर चर्चासत्र संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नबीरा महाविद्यालय, काटोल येथील रसायनशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये अन्नातील भेसळीबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने गटचर्चासत्र व दोन मिनिटांचे भाषण या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

अन्नपदार्थांमध्ये निकृष्ट, हानिकारक किंवा अवांछित पदार्थ मिसळण्याच्या वाढत्या प्रकारांमुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना अन्न भेसळीची कारणे व प्रकार, आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, भेसळ ओळखण्याच्या पद्धती, प्रतिबंधात्मक उपाय तसेच संबंधित कायदेशीर तरतुदी याबाबत सविस्तर माहिती मिळाली.

या गटचर्चासत्र व दोन मिनिटांच्या भाषणामध्ये एकूण १८ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रत्येक विद्यार्थ्याने नेमून दिलेल्या विषयाचे स्पष्ट, माहितीपूर्ण आणि प्रभावीपणे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून अन्नाची गुणवत्ता आणि सुरक्षितता याबाबत जनजागृती करण्याचा संदेश देण्यात आला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. सुनीलकुमार नवीन, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. निलेश गंधारे, प्रा. निलेश जाधव, प्रा. कैलास मोरे, डॉ. मनीष येवले, प्रा. दिशा बांद्रे तसेच शिक्षकेतर कर्मचारी सुदेश रामावत, शैलेश मेंढे आणि लोचन राऊत यांनी परिश्रम घेतले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

## रजनी टेकाडे इनका निधन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**

प्लाट नंबर २, श्याम नगर, हुडकेश्वर रोड निवासी रंगुबाई (रजनी) बाई पण्डितराव टेकाडे (८२ वर्ष) का निधन हो गया। अन्तिम यात्रा १४ अगस्त को सुबह ११ बजे उनके निवास स्थान से निकलकर पिपला श्मशान घाट जाएगी।

## कवडसजवळ दोन दुचाकींची धडक, उपचारादरम्यान एकाचा मृत्यू

### हितज्योती आधार फाउंडेशनची तत्काळ मदत, दोन्ही दुचाकींवरील तिघे जखमी, एकाचा मृत्यू, चार दिवसात दोन जणांचा अपघाती मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

कवडसजवळ दोन दुचाकींची जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले. मृतकाचे नाव यश संतोष मोरे (रा. राजुरा, जि. चंद्रपूर) असे आहे. ते वलनी येथील डब्लूसीएलमध्ये कार्यरत होते. ते नुकतेच सुमारे दोन महिन्यांपूर्वी ड्युटीवर रुजू झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, MH 34CC-8457 क्रमांकाच्या दुचाकीवरून यश मोरे प्रवास करत होते. ही दुचाकी रॉंग साईडने जात असल्याची माहिती समोर आली आहे. याचवेळी MH40CK-2654 क्रमांकाच्या ज्युपिटर दुचाकीवरून रितेश बागडे (वय २५) आणि दीप्ती बागडे (वय २४), रा. खापा, ता. सावनेर, जि. नागपूर हे दोघे भाऊ-बहीण नागपूरच्या दिशेने जात होते. दोन्ही दुचाकींची धडक झाल्याने तिघेही जखमी झाले.

घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना मिळताच त्यांनी तत्काळ हितज्योती आधार फाउंडेशनच्या टीमला घटनास्थळी रवाना केले. तसेच सावनेर पोलीस निरीक्षक ऋतुजा जाधव यांना घटनेची माहिती देण्यात आली. त्यानंतर सावनेर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

जखमींना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. दोघांना पाटणसावंगी येथे, तर एकाला वलनी येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान यश संतोष मोरे यांचा मृत्यू झाला. दरम्यान, दीप्ती बागडे या फ्छढ पोलीस दलात कार्यरत असून त्यांच्या पायाला फ्रॅक्चर झाल्याची माहिती आहे. त्यांच्यासह रितेश बागडे यांच्यावर उपचार सुरू आहेत.अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी रोहित कश्यप, विकेश सहारे यांच्यासह हितज्योती आधार फाउंडेशनच्या टीमने तत्काळ मदतकार्य केले.

### रॉंग साईड ड्रायव्हिंग ठरते धोकादायक

या अपघातामुळे कवडस परिसरातील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, रॉंग साईडने वाहन चालविणे किती धोकादायक ठरू शकते, हे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. अपघाताच्या नेमक्या कारणाचा तपास सावनेर पोलीस करीत आहेत.